
# छात्र प्रबोधन

वर्ष ४ अंक ८
सौर फाल्गुन शके १९१७



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक


पराक्रमांची गुढी उभारू
धरू हीच कामना
वसंत येथे सदा फुलावा
हीच मनी प्रार्थना !
नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

ॐ

छात्र
# प्रबोधन

वर्ष ४ अंक ८
सौर फाल्गुन, शके १९१७



इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात.

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेंद्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
**मुखपृष्ठ**
खलील खान
**आतील चित्रे**
भास्कर सगर, पुणे.
**अक्षर जुळवणी**
अक्षय एंटरप्राईजेस ॲण्ड सर्व्हिसेस
५१६ ब, नारायण पेठ, पुणे-३०
**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
% ४७७६९१
**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे - २.
**वार्षिक वर्गणी**
रु. ७५/-
**नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII
**प्रकाशन दिनांक**
सौर १ फाल्गुन, शके १९१७
२० फेब्रुवारी १९९६

## या अंकात दडलंय काय?


- संवाद २
- गुढीपाडवा ३
- कविता... 'चुकले माझे!' ६
- कथा - अतिरेक्यांचा डाव उधळला ७
- आम्ही अशा फुललो ११
- डोळस भटकंती - ओळख शंखशिंपल्यांची १९
- आम्ही चितोर युवती - क्रीडा - प्रात्यक्षिके २१
- असे हे गणित - कूट प्रश्न २५
- जरा डोके चालवा २८
- कथा - चिमा आजी २९
- प्रयोग करून तर पाहा ३३
- अभ्यासातील स्वावलंबन - आकृत्यांचे रेखाटन व वाचन ३५
- एक स्वयंभू व्यक्तिमत्त्व ३९
- वाचलेच पाहिजे असे काही - नेगल ४१
- निरामय आरोग्य - देखणे ते डोळुले ४३
- आम्ही उसळत्या लाटा ४५
- विविध शिबिरांच्या सूचना ४७
- कार्यालयीन पत्ते ४८


*गतकाळाची होळी झाली धरा उद्याची उंच गुढी, पुराण तुमचे तुमच्यापाशी ये उदयाला नवी पिढी.*

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

## संवाद

*गेले २ महिने महाराष्ट्रभर हिंडतो आहे. अनेक ठिकाणी प्रबोधकांचे उत्साहवर्धक मेळावे होत आहेत. तुमच्यापैकी अनेकजणांच्या समक्ष भेटी-गप्पांमधून छात्र प्रबोधनबद्दलचे तुमचे प्रेम, आपुलकी जाणवत असते. त्या सर्वांबद्दल समाधान आहे. शालेय अभ्यासातील मार्कांपलीकडे स्वत:च्या क्षमता विकसित करण्याची व इतरांसाठी काही काम करण्याची प्रेरणा तुमच्यात जितक्या लवकर निर्माण होईल तितका या मेळाव्यांचा, शिबिरांचा अन् मासिकाचा उपयोग झाला असे मी समजेन.*

*प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ तुम्ही काळजीपूर्वक पाहता का? त्यातील आशय जाणून घ्यायचा प्रयत्न करता का? यावेळचे मुखपृष्ठ काय सूचित करते? ८ मार्च हा जागतिक महिला दिन! त्यानिमित्ताने स्त्रियांमधील असलेल्या अफाट शक्तीचे प्रतीकच या चित्रातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. मलपृष्ठावरील कविताही याच अर्थाला साजेशी आहे. आजच्या आमच्या प्रबोधिका-मुली उद्याच्या सामर्थ्यशाली महिला होणार आहेत; व्हायला हव्या आहेत.*

*'मला हे जमणारच नाही कारण मी मुलगी आहे' अशा कल्पना आता मनातून काढून टाकायला हव्यात. मानसिक, बौद्धिक सामर्थ्य अन् कष्टाची, झोकून देण्याची तयारी यातून आजच्या काळातील एकही क्षेत्र युवतींनी - स्त्रियांनी असे ठेवले नाही की जिथे त्यांनी पराक्रम करून दाखविला नाही आणि म्हणूनच* ***जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व प्रबोधिकांनी सर्वार्थाने समर्थ होण्याचा संकल्प करायला हवा.***

***अर्थातच त्यांचे संकल्प पूर्ण होण्यासाठी प्रबोधक मित्रांनीही आपली मनोभूमिका योग्य रीतीने तयार करायला हवी.*** *'तू मुलगी आहेस, तुला हे जमणार नाही.' असे त्यांनी म्हणता कामा नये. घरी आपल्या बहिणीला, शाळेत मुलींना कमीपणाची, अन्यायाची, आपपरभावाची वागणूक मिळणार नाही याकडे आपणही लक्ष पुरविले पाहिजे. मुलींची छेड काढण्यात, त्यांना त्रास देण्यात आसुरी आनंद मिळविणाऱ्यांना प्रबोधक मित्रांनी चांगला धडा शिकवायला हवा. समानतेच्या नात्याने, निकोप दृष्टिकोनातून मुलींच्या विकास प्रक्रियेतील अडथळे यथाशक्य आपण दूर करायला हवेत. महिला दिनाच्या निमित्ताने ही परस्परपूरक होण्याची भूमिका प्रबोधक मित्रमैत्रिणी समजून घेतील ही अपेक्षा.*

*विनोद विशेषांक आवडला का? तुमच्या प्रतिक्रिया अन् नव्याने सुचलेले विनोद जरूर लिहून पाठवा.* ***पुढचा अंक 'ग्रामीण विशेषांक'*** *आहे बरं का! २१ जानेवारी रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या युवती विभागातर्फे झालेल्या नेत्रदीपक क्रीडाप्रात्यक्षिकांचे सविस्तर वर्णन या अंकात वाचालच.* ***सुट्टीतील*** *विविध शिबिरांची योजना याच अंकात जाहीर केली आहे. आपल्यापैकी अनेकांनी या* ***शिबिरांमध्ये आवर्जून सहभागी व्हावे.***

*इ. १० वी - १२ वी च्या सर्वांना त्यांच्या परीक्षेसाठी अन् इतरांना अभ्यासासाठी शुभेच्छा. तसेच* ***गुढी पाडव्याच्या निमित्ताने सुरू होणारे नूतन वर्ष आपणा सर्वांना आरोग्यसंपन्न अन् यश देणारे जावो; यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !***

सस्नेह तुमचा

**(महेन्द्र सेठिया)**

# गुढीपाडवा

**प्रा. यशवंतराव लेले**

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे वर्ष प्रतिपदा ! सायंकाळी चित्रा तारका पूर्व क्षितिजावर दिसू लागली की चैत्र महिना सुरू झाला असे समजावे. त्या चैत्र महिन्याचा प्रथम दिन म्हणजेच चैत्र शुक्ल प्रतिपदा ! 'कालनिर्णयात' या दिवशीच महाविषुवदिन दाखवलेला दिसेल. महाविषुवदिन म्हणजे रात्र अन् दिवस ठीक १२ तासांचे असणारा दिवस ! असा दिवस वर्षात पुनश्च पाहायचा तर ६ महिन्यांनी २३ सप्टेंबरपर्यंत वाट पाहावी लागते. २० मार्च आणि २३ सप्टेंबर या दोन्ही दिवशी समसमान दिवस व रात्र असूनही आपल्याला अधिक ओढ असते ती २० मार्चला येणाऱ्या महाविषुवदिनाची ! याचे कारण शीतकाळात गारठून गेलेल्या सर्वच भारतीयांना अधिक ऊब हवी असते अन् ती देणारा वसंतच असतो. वसंताचे आगमन म्हणजे सुवासांची पखरण! वसयति इति वसंत. असे या सुगंधी ऋतूचे नामकरण झालेले आहे. सारं वातावरण फुलांच्या गंधाने प्रसन्न करून टाकतो. म्हणूनच तो वसंत ! या महिन्याचे प्राचीन नाव देखील किती गोड! त्याला 'मधु' मास म्हणत असत. हे अगदी वेदांइतकं जुनं नाव ! आनंदाने गुढी उभारावी असाच हा काळ ! म्हणून तर वैशाखीची धुंदी चढून सारा पंजाब नाचू लागतो. महाराष्ट्रात सुग्रीष्मक म्हणजे शिमगा अन् रंगपंचमी साजरी होऊन गेलेली असते. या गुढीपाडव्याला ज्याचा प्रारंभ होतो आहे त्या वर्षाचं नाव आहे धातृ! नूतन वर्षासाठीचे नाना संकल्प साकार



*रंग सांगे रानाचा, गंध बोले पानाचा वसंत आला ; वसंत आला ; निरोप हिरव्या पानाचा.*



*With Best Compliments From* ***SUNIKEM ENTERPRISES PUNE.***

करणारे म्हणून याचे नाव धातृनामक संवत्सर ! आपण १२ महिन्यांना विविध तारकांचे स्मरण देणारी नावे ठेवली तशी ती जगभरच्या लोकांनी आपआपल्या भाषेप्रमाणे नि संस्कृतीप्रमाणे ठेवलेली आहेतच, पण भारतीयांची सांस्कृतिक श्रीमंती आणखीनच मोठी ! त्यामुळे प्रत्येक वर्षाला एक वेगळं नाव ठेऊन साठ वर्षांचं एक छानसं वर्षचक्र आपण फार प्राचीन काळापासून सुरू केलेले आहे. त्या संवत्सर चक्रातील या पाडव्याला प्रारंभ होत असणारे धातृनामक वर्ष क्रमाने दहावे आहे.

हेमंत अन् शिशिर ऋतूचा निरोप घेऊन आता आपण वसंतास सामोरे जातो आहोत. हेमंताची हुडहुडी अन् शिशिराची शिरशिरी अनुभवून आपण आयुर्वेदातील आदान काळ पार केला आहे. आपण शीतकाळात शक्तिसंचय केलेला असून आता वसंतात आपले आरोग्यसंपन्न शरीर पाचही इंद्रियांना तृप्त करण्यास समर्थ बनलेले आहे !

नूतन वर्षाचा प्रारंभ दिन असा हा पाडवा परंपरेने आपण पाळत आलो आहोत तो एक पर्वणी म्हणून ! एक सुमुहूर्त म्हणून ! साडेतीन मुहूर्तांपैकी एक परिपूर्ण मुहूर्त म्हणून ! शारीरिक विकसनाचा एक टप्पा पुरा करून बौद्धिक विकसनावर भर देण्यासाठी हा मुहूर्त वापरायचा असतो. अहो प्रत्यक्ष सृष्टीची रचनाच ब्रह्मदेवाने या दिवशी सुरू केली. या पृथ्वीवर जीवसृष्टी ज्याच्यापासून सुरू झाली त्या मत्स्यावताराचा हा शुभदिवस ! ही प्रतिपदा म्हणजे मत्स्य प्रतिपदा !

वानरराज वालीच्या वधाने विपत्तीतून मुक्त झालेल्या लोकांनी आनंदाने जल्लोष केला; गुढ्या तोरणे उभारली ती या पाडव्याच्या दिवशीच ! अन्याय, अत्याचार, अनाचार आदींमधून मुक्तीची गुढी उभारण्याचा हा दिवस !

१४ वर्षांचा वनवास भोगून व वनवासकाळातच राक्षसी प्रवृत्ती, अनीती आदींचा अंत करून प्रभू रामचंद्र अयोध्येत परतले ते पाडव्याच्या दिवशी ! वर्ष प्रतिपदेच्या पवित्र दिनी रामराजा सिंहासनारूढ होऊन रामराज्याचा शुभारंभ झाला म्हणून सहस्त्रावधी वर्षांपासून चैत्र शुद्ध प्रतिपदा परमपवित्र तिथी म्हणून मान्य झाली आहे. धर्मराजाच्या राज्याभिषेकाचा सुमंगल दिनही चैत्राचा हा प्रथम दिवसच मानण्यात येतो. त्यामुळे युधिष्ठिरशकारंभ याच दिवशी असतो.

सातवाहन म्हणजे शालीवाहन वंशातील ३० राजांनी महाराष्ट्रापासून थेट आंध्रप्रदेशातील कृष्णा-गोदा या नद्यांच्या मुखांपर्यंत राज्ये चालवली. गौतमी पुत्रांनी पैठण ही आपली राजधानी केली पण त्यांची मूळ राजधानी दूर तामिळनाडूतील धरणीकोट किंवा धनकाटक ही होती. असे हे थोर राजे शकांच्या आक्रमणास प्रतिबंध करण्यात यशस्वी झाले. त्यामुळे ते शकारी ठरले. कालगणनेसाठी ‘‘शक’’ हे नाव



**प्रायोजक : विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्ट्स प्रा. लिमिटेड, पुणे.**


ठेऊन शालीवाहनांच्या विक्रमाची स्मृतीच आपण चिरंजीव केलेली आहे. पाडव्याच्या पहाटेच घरोघरी गुढी-उभारताना त्या सातवाहन राजधुरंधरांचे स्मरण आपल्याला होत असते.

यंदा धातृनाम संवत्सराचा पाडव्याच्या दिवशी करावयाचा शुभारंभ आपण कसा साजरा करू या? गुढ्या तर उभारू पण ध्यानात घेऊ या की ही गुढी म्हणजे ध्वजा असते. भगवद्-ध्वज घराघरावर उभारण्याचा हा दिवस ! भगवा झेंडा नि जरीपटका उंच आकाशात डौलाने फडकावा हे तर आपले स्वप्न आहेच पण त्याबरोबर हेही ध्यानी ठेऊ या की नववर्षदिनी नूतन संकल्प करणे व पूर्वी केलेले संकल्प किती सफल झाले हे पाहाणे हे सर्वाधिक महत्त्वाचे ठरते.

उज्ज्वल भविष्याचे संकल्प करत असताना कडुलिंब खाण्याचे हे तंत्र कसे काय सुरू झाले? लवकर उठणे, व्यायाम करणे या गोष्टी बुद्धीला कितीही पटल्या तरी शरीराला कुठे हव्याशा वाटतात? त्या कडूच वाटतात ना? तसं हे आहे कडुलिंब भक्षणाचं तंत्र ! कडुलिंबाची ती पाने आरोग्य, बल, बुद्धी, ओज आणि तेज देतात म्हणून ती या काळात खायची सूचना आयुर्वेदाचार्यांनी केली आहे. पाडव्याच्या दिवशी कडुलिंबाची पाने खायची ती भविष्यात आरोग्य उत्तम राहावे म्हणून. वर्षारंभी अन् अगदी रोजही २/४ कडू पाने भक्षण करून दीर्घकालीन आरोग्याची प्राप्ती होत असेल तर?

विचारी माणसाला, निर्धार करणाऱ्या माणसाला, दीर्घकालीन सुखाला महत्त्व देणाऱ्या माणसाला हसत हसत कडू पाने गिळणे शक्य होत असते. प्रारंभ कडू वाटला तरी सारे वर्ष गोड करण्याचे बीज त्या छोट्या पानात आहे हे महत्त्वाचे ! सुरुवातीस विषासारखं कडवट असलं तरी अमृतासारखा परिणाम साधणारं कडुलिंबाचं पान आपण प्रसन्नपणे स्वीकारू तर आपण राजस सुखाचे अधिकारी होऊन जाऊच पण प्रतिकूलास पचवून परिस्थितीवर मात करण्याचे कौशल्यही आत्मसात करू शकू.

आता सूर्य विषुववृत्तापासून उत्तरेकडे निघालेला असतो म्हणजे उत्तरायणच चालू असते. उत्तरोत्तर उत्तमोत्तम प्रगती करण्याचे संकल्प अन् तसे खडतर प्रयत्न चालू राहतील तर आपल्या भविष्याचे विधाते आपण स्वत:च ठरू शकतो. मग धातृनामक नवसंवत्सर आपल्या दृष्टीने सार्थ ठरेल. तसे ते ठरावे ही शुभेच्छा !





**प्रायोजक : ॲडॅप्ट रेकॉर्डिंग इन्स्ट्रुमेंट्स प्रा. लि. पुणे**

# ‘चुकले माझे!’

तीन पईंचा पैसा; न कळे स्वस्ताई सांगुनी
एका पैश्यालाही होती किम्मत जगि चलनी ।।धृ।।

दोन प्रहरी उतरला नदीमधी गृहस्थ स्नानाला
म्हणे नोकरा ‘‘पैसा घे हा तुझ्या खरेदीला !
पैश्याचे या पेढे घेऊनी लौकर ये धावुनी’’...१

हलवायाच्या दुकानि जाई सत्वर तो नोकर
म्हणे ‘‘कसे हे पेढे दिधले सांगा हो लौकर !’’
उत्तर आले ‘‘तीनच दुसऱ्या, चार तुला म्हणुनी’’...२

नोकर धावे तसेच पेढे घेऊनि हातातुनी
म्हणे स्वत:शी ‘‘यातिल माझा एक’’ मुखी घालुनी
पडला दुसरा पेढा खाली; उचले मातीतुनी...३

म्हणे स्वत:शी ‘‘असला पेढा देऊ कसा मालका?
सांगिन त्याला हा घोटाळा, करील मान्य चुका’’
दुसरा पेढा पुसुनि मग टाकि मटकावुनि...४

जाता थोडे पुढे, पाहुनि करि पेढे दोन्ही
म्हणे स्वत:शी ‘‘देईल मालक मजसि एक यातुनी
इथेच खावा झाले’’ पुढती जाई कृति करूनी...५

एकच पेढा धन्यास नंतरी लागे ते द्याय
घडलेली ती कथा आपुली लागे सांगाया
ऐकुनि सारे ‘‘खाल्ले कैसे?’’ पुसतसे मग धनी...६

‘‘ऐसे’’ म्हणूनि नोकर दावि खाऊनिया चवथा
धन्यास घडवि उपास त्यादिनी नोकर परि हा वृथा
म्हणे धनी ‘‘रे, चुकले माझे तुलाच पाठवुनी’’...७

**गंगाधर महाम्बरे**



***Sponsored by MANSI ENTERPRISES, Sister Concern of Africa Drug House, Pune-30.***

# अतिरेक्यांचा डाव उधळला !

**द्वारकानाथ लेले**


''विशू, अरे जेवायचं नाही का? अकरा वाजायला आले. सकाळपासून पुस्तकात डोकं खुपसून बसला आहेस. अभ्यास, जेवण याची शुद्ध नाही.'' आई ओरडली तेव्हा विश्वजितनं पुस्तकातून डोकं वर काढलं.

त्याच्या मनात आलं आईला म्हणावं, ''आई तूही हे पुस्तक वाच. स्वयंपाक करायचा विसरून जाशील.''

पण तो काही बोलला नाही. तसाच पानावर बसला. पण जेवणाकडं त्याचं लक्षच नव्हतं. डोक्यात पुस्तकाचेच विचार घोळत होते.

आता तो नववीत होता. पण आईवडील दोन वर्षापूर्वीपासून मागे लागले होते, ''विशू अभ्यास कर. तुला इंजिनियर किंवा डॉक्टर व्हायचं आहे.''

विश्वजितला कळत नव्हतं साऱ्यांनीच डॉक्टर, इंजिनियर होऊन काय करायचंय.



बाकीची क्षेत्रं नाहीत? त्याला वाटायचं आपण पत्रकार व्हावं. पण कसं ते त्याला कळत नव्हतं. आज 'तुम्हाला बातमीदार व्हायचंय?' हे पुस्तक वाचलं आणि त्यानं मनाशी निश्चय केला ''बास, पत्रकार हेच करियर करायचं. पण हे आई-बाबांना कसं पटवून देणार?''

डोळ्यापुढे पुन्हा पुस्तक सरकायला लागलं. त्यात बातमी कशी मिळवावी, कशी लिहावी, बातम्या मिळविण्याचे मार्ग अशी निरनिराळी प्रकरणं होती आणि शेवटच्या पानावर ठळक अक्षरात लिहिलं होतं - ''तुम्हाला बातमीदार व्हायचं असेल तर किमान चार गोष्टी आवश्यक आहेत.

१) आजूबाजूला घडणाऱ्या घटनांबाबत माझा काय संबंध, मला काय करायचंय असा विचार न करता प्रत्येक गोष्टीत डोकावून पाहा. कदाचित त्यातूनच एखादी चांगली बातमी मिळेल.

२) आळस न दाखवता कुठेही आणि केव्हाही जायची तयारी ठेवा.

३) पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय कोणाशीही बोलू नका.


४) प्रत्येक घटनेकडे सामान्य वाचकाच्या दृष्टिकोनातून पाहा. जी तुम्हाला वाचायला आवडेल अशी कोणतीही घटना बातमी होऊ शकते.''

विश्वजितच्या डोळ्यापुढे आता जेवतानाही वरील चार ओळी नाचत होत्या.



**प्रायोजक : स्वस्तिक बिल्डर्स (अनिल लोढा, राजेंद्र गोठी) मखमलाबाद, नाक्याजवळ, नाशिक % ७३६०.**





संध्याकाळी शाळेतून आल्यावरचा वेळ विश्वजितला गॅलरीत उभं राहून काढायला लागायचा. 'तुम्हाला बातमीदार व्हायचंय?' पुस्तक वाचून नवी दृष्टी आली होती; पण संधी मात्र येत नव्हती.

आणि अखेर एके दिवशी ती संधी आली. नेहमीप्रमाणे विश्वजहत गॅलरीत उभा असताना एक बंद काळ्या काचा असलेली मोटार शेजारच्या बंगल्यापुढे येऊन उभी राहिली आणि त्यातून चार माणसे बाहेर उतरली व न बोलता बंगल्यात शिरली. त्या माणसांचा पोषाख दिसण्यास संशयास्पद होता. बहुतेकांची दाढी वाढलेली होती. कपडे मळके, जुने होते. शेजारचा बंगला खन्ना नावाच्या कोणा पंजाबी सरकारी अधिकाऱ्याचा होता. यापलीकडे विश्वजीतला माहिती नव्हती. झटकन त्याला पुस्तकातला नियम आठवला. कोणत्याही घटनेकडे 'मला काय करायचंय या दृष्टीने पाहू नका' हा नियम आठवताच विश्वजितचं कुतुहल जागृत झालं.

तो गॅलरीच्या एका टोकाला सरकला. तेथून खन्नांचा दिवाणखाना दिसत होता. मोटारीतून आलेली माणसं दिवाणखान्यातील कोचावर बसली. खन्नाही येऊन बसले. नंतर एकानं हातातील पोतं सोडलं आणि त्यातून दोन आखूड बंदुका व दोन बॉंब टेबलावर ठेवले. ते खन्नांनी

जगाकडे पाहण्याची जणू एक नवीन खिडकीच उघडली गेली होती. काय करायचं हे ठरलेलं होतं. फक्त कधी करायचं याची विश्वजित संधी पाहत होता.

गावातली जागा सोडून गावाबाहेर सोसायटीत राहायला आल्यापासून विश्वजितला कंटाळा येत होता. गावात वाड्यात भरपूर मुलं होती. त्यामुळे वाड्याच्या अंगणात दिवसभर धुमाकूळ घालता येत होता. आता समोर मैदान होतं. पण खेळायला मित्रच नव्हते. सोसायटीत सारी संमिश्र वस्ती होती.

जो तो स्वत:तच मश्गूल ! त्यामुळे

 *शब्द बनातून अर्थ झळाळे; वेळूबनातून वात जसा; मातीतून अंकुरतो मोती; मनात रुजतो शब्द तसा.*

**प्रायोजक : मे. ओम् कन्स्ट्रक्शन, प्रो. प्रा. माणिकराम हळबे, पुणे ४११ ०३०.**

तपासून पाहिले.

विश्वजितनं मंत्र्यांचे रक्षक वापरतात ती स्टेनगन पाहिली होती. त्यामुळे त्याला टेबलावरील बंदुका ओळखता आल्या. खन्नाने आलेल्या माणसांना काहीतरी सूचना दिल्या. परंतु अंतर बरंच असल्यानं त्या विश्वजितला ऐकू आल्या नाहीत. आलेल्या माणसांनी चहा घेतला आणि ते उठले. खन्नांनी बंदुका व बाँब कपाटात ठेवले आणि ते पोचवायला दारात आले. मोटार सुरू होताच ते दोनच शब्द म्हणाले, ‘‘नाऊ डे आफ्टर टुमारो.’’ आणि मोटार निघून गेली. खन्नांच्या दिवाणखान्यात अंधार पसरला. विश्वजितनं मोटारीचा नंबर पाहून लक्षात ठेवला.

विश्वजितच्या मनातला बातमीदार जागा झाला. ‘डे आफ्टर टुमारो,’ म्हणजे परवा दिवशी ! आज १२ ऑगस्ट म्हणजे १४ ऑगस्ट.

बंदुका, बाँब, १४ ऑगस्ट यांचा परस्पर संबंध काय? विश्वजीत विचार करू लागला आणि त्याला पटकन सुचलं म्हणजे या बंदुका व बाँबनी १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन समारंभ उधळायचा तर यांचा विचार नाही? त्याची तयारी १४ ऑगस्टला? त्या दिवशी काय घडतंय ते पाहण्याचं त्यानं ठरवलं.

१४ ऑगस्ट सायंकाळी ७ वाजता पूर्वीचीच बंद काळी मोटार खन्ना यांच्या बंगल्यापुढं येऊन उभी राहिली. ती पाहताच विश्वजितनं बंगल्याच्या कुंपणावरून उडी मारून खन्नांच्या बागेत प्रवेश केला. दिवाणखान्याची खिडकी बागेत उघडत होती. शेजारी झाडं असल्यानं तिथं दडून दिवाणखान्यातलं बोलणं ऐकू येणार होतं. विश्वजीत श्वास रोखून उभा राहिला.

खन्नांनी कपाट उघडलं. बाँब व बंदुका बाहेर काढल्या. दोन बाँब हातात घेऊन ते म्हणाले, ‘‘परमिंदर ये लो बाँब तुम्हारा काम सी.एम्. आतहेही बाँब फेकना निशाना चुकाना नहीं। परमिंदरनं मान डोलावली.

बंदुका हातात घेऊन ते दुसऱ्या दोघांना म्हणाले, ‘‘इंदर और प्रकाश तुम ये बंदूक लेकर गाडी के पास खडे रहना। अगर परमिंदरको किसीने रोका तो गोली चलाना। प्रवीण तुम्हारा काम गाडी चलाना है। हो गया?’’ सर्वांनी माना डोलावल्या आणि ते उठले. विश्वजितही पुन्हा कुंपणावरून उडी मारून स्वत:च्या बंगल्यात आला.

काय करावं? उद्या होणारा हा हल्ला तर रोखायलाच हवा. वृत्तपत्राकडं जावं की पोलीसांकडे? पण वृत्तपत्र काय करणार? पोलीसांनाच कळवायला हवं. आई बाबा घरात नव्हते ते विश्वजितच्या पथ्यावरच पडलं. त्यानं थेट पोलीस कमिशनरनाच फोन लावला.

‘‘मी विश्वजीत बोलतोय. उद्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमावर बाँब फेकण्याच्या कटाची मला माहिती मिळाली आहे आणि ती मला तुम्हालाच द्यायचीय.’’


‘‘आँ?’’ कमिशनरनी आश्चर्य व्यक्त



**प्रायोजक : मे. आर. डी. वीरकर आणि कं. वीट कारखानदार, सिंहगड रस्ता, पुणे.**

केले. ''तुम्ही ताबडतोब माझ्या ऑफिसात येता?'' ''हो'', म्हणून विश्वजितनं फोन बंद केला.

विश्वजीतनं सायकल काढली आणि थेट कमिशनरच्या ऑफिसात पोचला. विश्वजीत एक शाळकरी मुलगा आहे हे पाहून कमिशनरांना आश्चर्य वाटलं. त्यानं पहिल्यापासून घडलेली हकिकत त्यांना सांगितली. क्षणभर त्यांनी विचार केला आणि म्हणाले, ''रात्रभर तुझी आम्हाला मदत लागणार आहे. मी तुझ्या घरी फोन करतो.'' त्यांनी फोन लावला. ''मी पोलीस कमिशनर बोलतोय. तुमचा मुलगा विश्वजीत माझ्यापुढं बसला आहे. त्यानं अतिशय महत्त्वाची माहिती दिलीय. त्यासाठी तो रात्रभर हवा आहे. उद्या सकाळी घरी येईल. काळजी करू नका.'' त्यांनी फोन बंद केला.




त्यानंतर पुढचे दोन तास तो पोलीसांना खन्ना, त्यांच्याकडे आलेले लोक, मोटारीचा नंबर हा तपशील देत होता. पोलीस त्याची खात्री करून घेत होते.

पहाटे चार वाजता स्वत: कमिशनर विश्वजितला घेऊन पोलीसांसह खन्नांच्या बंगल्यावर पोचले. झोपेत असलेल्या खन्नांना त्यांनी अटक केली. त्यांच्याकडून इतरांचे पत्ते घेतले. खन्नांना बरोबर घेऊन बाकीच्या चौघांना पकडले. त्यांच्याकडील बंदुका, बॉंब जप्त केले. कट उधळला गेला.

पहाटेचे सहा वाजले. विश्वजीत घरी आला. त्यानं आई-बाबांना सारी हकीकत सांगितली. आठ वाजता होणाऱ्या झेंडावंदन कार्यक्रमात त्याचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार होणार होता. त्यासाठी ते तिघेही हजर राहिले. समारंभात मुख्यमंत्र्यांनी ही माहिती जाहीर केली तेव्हा साऱ्यांनी विश्वजितचे कौतुक केले.

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रातून विश्वजितच्या फोटोसह ही बातमी प्रसिद्ध झाली आणि विश्वजीतचा पत्रकार होण्याचा विचार नक्की झाला.

***



**चि. हृषिकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना शुभेच्छा !**

# आम्ही अशा फुललो...

**नीता ओसवाल**

***साऱ्याच कळ्यांना जन्मसिद्ध***
***हक्क आहे फुलण्याचा ।।***
***मातीमधला वतनवारसा***
***आकाशावर कोरण्याचा ।।***
***जन्म असो माळावरती***
***अथवा शाही उद्यानात***
***प्रत्येक कळीला हक्क आहे***
***फूल म्हणून जगण्याचा ।।***

असं कवी कुसुमाग्रज म्हणतात, त्यावेळी समान हक्काचं महान तत्त्व ते शब्दात आग्रहानं पकडू पाहतात. ८ मार्च हा दिवस म्हणजे जागतिक महिला दिन ! स्त्रीची विविध रूपं तुम्ही अवतीभवती पाहत असता. घरामध्ये सगळ्यांच्या बारीकसारीक गरजाही पुरवण्यासाठी धडपडणारी तुमची आई, घरोघरी धुणंभांड्यासारखी कष्टाची कामं करणाऱ्या स्त्रिया, विविध क्षेत्रात आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर चमकणाऱ्या, नेतृत्व करणाऱ्या स्त्रिया, तुमच्या बरोबरीने शिकणाऱ्या तुमच्या बहिणी अशी एक ना अनेक रूपं ! समाजातील विविध स्तरांमध्ये होणारी स्त्रीची धडपड ही वेगवेगळ्या स्वरूपाची असते. काहीवेळा सामाजिक, सांस्कृतिक स्थितीचा रेटा असतो. सगळ्याची मनोमन जाण असते आणि व्यक्तिमत्त्व फुलत असते. काहीवेळा शतकानुशतकांच्या आर्थिक हलाखी, अज्ञान, दारिद्र्य, व्यसनाधीनता इ. समस्यांना तोंड देणारी एखादी माता मुलांसाठी ताठ उभी राहते. व्यवसाय करते; यशस्वी होते. तर एखादी आपल्या कामासाठी अविवाहित राहण्याचा निश्चय करते. त्यात समाधानी असते.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समाजातील स्त्रीजीवनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चार स्त्रियांच्या मुलाखती आपल्यासमोर ठेवत आहे. त्या चौघी कळ्याच; पण वेगवेगळ्या पद्धतीने फुलल्या. प्रत्येकीचे समर वेगवेगळे आहे. त्यासाठीची धडपडही वेगळी आहे.





**शिरीष पोंक्षे व प्रसाद पुरंदरे यांच्याकडून धडपडणाऱ्या प्रबोधकांना शुभेच्छा !**

एकीला रोजी रोटीसाठी झगडावं लागतं. तर दुसरीला समाज परिस्थितीशी समरस होण्यासाठी स्वत:जवळ असलेल्या कलागुणांच्या अभिव्यक्तीपासून दूर राहावं लागतं. प्रसंगी स्वत:शी मूकयुद्ध पुकारीत अन् मिळेल तेव्हा गुणांना व्यक्त करण्याची संधी घेते. एखादी जोडीदाराच्या बरोबरीने समान पातळीवर काम करते. तर एखादी समाज सेवेचे व्रत आचरणात आणण्यासाठी आजन्म अविवाहित राहते.

भोवतालच्या भिन्न परिस्थितीमुळे भिन्नपणे घडलेल्या महिला एकाच ठिकाणी वावरत असतात. मागे वळून पाहताना आज त्या काही प्रमाणात समाधानी दिसतात. तर भावी काळात स्त्रीनं कसं असावं याविषयी ठाम अपेक्षाही व्यक्त करतात.

त्यांच्याशी एक सविस्तर संवाद.

## कुसुम काची

''ए, मला २० रुपये दे की.''

''आरं, जारं, त्रास नगं देऊस.'' असा संवाद कुसुमचा आपल्या पतीशी दिवसातून १५-१६ वेळा तरी होत असतो.

लहानपणी लग्न झालं. जसजशी कुसुम मोठी होत होती, तसं लक्षात येत होतं की, 'नवरा व्यसनी आहे. काहीच कमवत नाही.' दीर-भावजय, आई-वडील, काका-काकू, इतर नातलग कोणीही जवळ घेत नव्हते. कुसुम गेली की चहा जरी जवळ असला तरी झाकून ठेवणार ! दारिद्र्य झाकायला कोणाकडूनही मदत मिळाली नाही.

लहानग्या कुसुमची अक्षर ओळख झालेली नसली तरी एवढं मात्र कळत होतं की, छोट्या मुलीसाठी काहीतरी मिळवलं पाहिजे. औरंगाबादहून पुण्याला सासरी आली होती. इथे सासरच्या लोकांशिवाय ओळखीचं कोणी नाही. अंगावरचे कपडेसुद्धा धड नाहीत. ''मांडीवर मूल. एका छोट्या टोपलीत काही-बाही फळं आणि असा आमचा व्योपार.'' अशी तिच्या व्यवसायाची सुरुवात !

आजूबाजूच्या लोकांपैकी कोणी तिची चेष्टा केली तर कोणी मदत! एक ऊस विकणारे गृहस्थ होते. त्यांनी उधारीवर २५ रुपयांचा ऊस दिला. तो सोलून सवरून विकला.

असं काही दिवस केलं अन् एके दिवशी एका मैत्रिणीनं, आधीची ओळख काही नाही, सांगितलं, ''कुसुमताई, मी फळं आणून देत जाईन. तू वीक. रोज २५ रुपये देईन.'' असं करत नियमित कमाई सुरू झाली. खूप आनंद झाला कुसुमताईंना ! पण कष्ट अवाढव्य.





**छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा ! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.**

सकाळी लवकर उठायचं, दोन्ही मुलांचं उरकायचं, स्वयंपाक करायचा, मुलांना भरवायचं आणि मंडईत यायचं. काम सुरू. कामातला नियमितपणा, त्यातील हुशारी पाहून मदतीचे अनेक हात पुढे आले.

त्यांनी अनेक मित्र जमवले. त्यातील एका मित्रानं सांगितलं. ''तुम्ही अशी दुसऱ्याची फळं विकता. मी तुम्हाला दलालाकरवी फळं कमी किमतीत विकत घेऊन देईन. तुम्ही स्वत:ची फळं विका.''

असं करत करत एक गाडी, एक दुकान, मग दोन-तीन दुकानं आणि आता टेम्पोसुद्धा !

तरुण वयामध्ये कुसुमताई, पुण्याच्या मंडई व मार्केट यार्डाच्या किरकोळ व ठोक बाजारात पुरुषांच्या बरोबरीनं त्रास सहन करत होत्या. पण जिद्द व चोख व्यवहार यांच्या बळावर स्पर्धेत टिकू शकल्या.

एक मुलगी व दोन मुलं. मुलीचं लग्न केलं. दोन्ही मुलं शिकत आहेत. नवरा अजूनही दारू पिऊन तसाच तर्र असतो. बाकी सर्व आनंदात आहे. असा दारूडा नवरा मिळाला त्यामुळे कष्ट करावे लागतात. आधी मुलं लहान असल्याने आणि आत्ता शिक्षण-आरोग्य यासाठी व्यवसाय चालवणं गरजेचं झालं आहे. त्यांची बहीण त्यांच्याकडेच असते. ती घरातील सगळं सांभाळते.

मुलांनी शिकावं असं त्यांना वाटतं. पण सध्याच्या स्पर्धेत त्याला नोकरी मिळेल की नाही याविषयी शंका वाटते. त्यानं हाच फळांचा व्यवसाय मोठा करावा असं त्या त्याला सांगत असतात.

शिक्षण शून्य तरीही व्यवहार उत्तम. व्यवसायातील खाचखळग्यांची उपजतच जाण अल्पशिक्षित असलेल्या कुसुमताईंना आहे.

अडचणी आहेत, प्रश्न आहेत पण त्यावर मात करण्याची जिद्द आहे. अशा या कुसुमताई. सुरुवातीला मुलांचं संगोपन करण्यासाठी म्हणून व्यापारात पडल्या आणि आज आत्मविश्वासाने आपला व्यवसाय सांभाळत मुलांनी खूप शिकावं हे स्वप्न उराशी बाळगून उमेदीने पुढे जात आहेत.

## ज्योती सुभाषचंद्र

ज्योतीच्या आई-काकू-मामी समाज-कार्यात होत्या. बाबा डॉक्टर-सेवादलाचं काम करायचे. स्वत:चं वेगळं क्षेत्र निवडू शकणाऱ्या वातावरणात २५-३० वर्षांपूर्वी ज्योती वावरत होती. सेवादलाच्या कार्यक्रमात नृत्य, नाट्य, संगीत या विविध कला विकसित होत होत्या. शाळेत असतानाच 'हिचा कल नृत्याकडे दिसतोय' असं घरच्यांना जाणवलं आणि तिनं त्यातील पदवी घेतली. त्यानंतर तब्येतीच्या काही तक्रारी आल्या आणि नृत्य पुढे नेता आलं नाही.

N.S.D. (National School of Drama) मध्ये नाटकाविषयी उच्च शिक्षण घेतलं. स्वत:तल्या नाट्यगुणांची तेथे प्रकर्षाने जाणीव झाली. नाटक हे नवं क्षेत्र उघड झालं. अनेक नाटकांत कामे केली. जे आवडेल तेच



**प्रायोजक : दिलीप टेलर्स, १२७३, सदाशिव पेठ, नवा विष्णू चौक, पुणे-३०.**

करायचं असे मुक्त निर्भर दिवस होते ते. आजूबाजूच्या वातावरणानं तिला फुलासारखं ठेवलं होतं. निवडलेलं क्षेत्र, समाजाची परिस्थिती, मुलगी म्हणून येणारे प्रश्न तिला फारसे जाणवतही नव्हते. लग्न झाल्यानंतर आहे ती परिस्थिती बदलेल, काम करण्यामध्ये काही अडचणी येतील असं वाटत नव्हतं. लग्न ठरवून ठेवलं होतं. ''...याच्याशीच लग्न करीन हा निश्चय होता.'' तिच्या होणाऱ्या नवऱ्याने वास्तवाची काहीशी जाणीव करून दिली. ''माझी बदली अशी खेडोपाडी होणार त्यात तुझं करीअर कसं करणार?'' पण त्यावेळीही प्रसिद्धी, प्रतिष्ठा याच्या एका उंचीवर असणाऱ्या ज्योतीला काही जाणवलं नाही.

आपली आई, काकू या जशा संसार सांभाळून आपल्या आवडीचं काम करतात तसंच आपणही करू शकू अशी एक भाबडी समजूत होती. पण संसारात पडल्यावर वास्तवाची जाणीव झाली.

मुलं लहान असताना त्यांच्याजवळ आई हवीच असं वाटायचं. आजही वाटतं. पण



मनातला कलाकार आत कुठेतरी अस्वस्थ होता. पण या अवस्थेतून मार्ग कसा काढावा ते समजत नव्हते.

या सगळ्या अनभिज्ञतेमुळे अभिव्यक्तीच्या क्षेत्रात शिखरावर पोहोचू शकल्या असत्या अशा ज्योती सुभाषचंद्र महत्त्वाच्या आठ वर्षांत या सर्व तथाकथित प्रसिद्धीच्या जगापासून अलिप्त राहिल्या.

लग्न झाल्यानंतर त्यांना नवऱ्याबरोबर बदलीच्या ठिकाणी खेडोपाडी हिंडावे लागले. पुण्या-मुंबईसारख्या अनुकूल वातावरणापासून दूर कुठेतरी ! सासरकडची मंडळी एका विशिष्ट रूढी परंपरांच्या चौकटीतली; त्यामुळे घरातही फारसं अनुकूल वातावरण नव्हतंच. मनात खोलवर एक असमाधान होतं आणि त्यात मुलं लहान होती. परिस्थितीच अशी होती की नाटकासारखं माध्यम जे तुमच्याकडून भावनिक गुंतवणूक, शारीरिक कष्ट, वेळाचं अवघड गणित सोडवणं यासारख्या अपेक्षा करतं, त्या पूर्ण करणं ज्योतीताईंना जड गेले. आणि एक पाऊल पानाआड लपले आणि अज्ञानात फुलू लागले.

या मधल्या काळात काही प्रयत्न केले. साताऱ्यामध्ये नरेंद्र दाभोळकरांबरोबर काही काम केले. तालुक्याच्या गावी कॉलेजमधील मुला-मुलींचं नाटक बसवणं, नृत्याचे काही वर्ग घेणं हे तुरळक प्रयत्न केले पण वेळ रिकामा असेल त्या वेळात ! या काळात माणूस म्हणून त्या खूप शिकल्या. त्याने आपला आत्मविश्वास न डगमगता उलट आपलं

 *जीवनाच्या वाटेवर असलाच जर अटळ संघर्ष; तर जरूर लढा सृजनाच्या बाजूने.*

***With Best Compliments From* MEDINI EXPORTS PVT. LTD., PUNE.**

व्यक्तिमत्त्व प्रगल्भ झालं. आपण नकळत कलाकार म्हणूनही वाढलो असं त्या म्हणतात.

ज्योतीताई व त्यांचे पती दोघांचीही एकमेकांना समजून घेण्याची प्रक्रिया ही चालूच होती. केवळ त्यामुळेच कलेपासून दूर राहाणं आपण सहन करू शकलो असं त्या कृतज्ञतापूर्वक म्हणतात. मुलं मोठी होत होती. सुदैवाने पतीची पुण्यात बदली झाली. एका टीपेच्या क्षणी असं वाटलं इतर मंडळींची खुषी-नाखुषी किती दिवस पाहायची? तो क्षण त्यांच्यासाठी बदलाचा बिंदू ठरला. परंतु असा विचार मनात येऊनही प्रत्यक्ष कामाची सुरुवात होण्यास एक-दीड वर्ष गेलंच.

मधल्या वयातील मुलांच्या संगोपनाकडे दौऱ्याच्या काळात जातीने लक्ष पुरवणारे ज्योतीताईंचे पती यांचे सामंजस्य-त्यांच्या परिपक्वतेचं दर्शन घडवतं. ज्योतीताईंचे ज्येष्ठ बंधू - मराठीतील एक मान्यवर नाटककार श्री. गो. पु. देशपांडे यांच्याशी सहज गप्पा मारताना NSD त प्रशिक्षण घेतलेल्या ज्योतीचे नाट्यगुण श्री. सत्यदेव दुबे यांच्या ध्यानात आले आणि गोविंद निहलानींच्या 'रुक्मावतीकी हवेली' या कलात्मक चित्रपटात महत्त्वाची भूमिका केली. दूरदर्शन मालिकांमधील छोट्यामोठ्या भूमिका हे सर्व चालूच होतं.

गिरीश कर्नाड यांच्या 'तुगलक' या नाटकापासून पुन्हा एकदा ''ज्योती सुभाषचंद्र'' हे नाव दिसू लागलं.

नंतर मग सुरू झालंच. विजय तेंडुलकरांचं 'विठ्ठला' सई परांजपेंचं 'माझा खेळ मांडू दे.' महेश एलकुंचवार यांच 'आत्मकथा'! आवडेल ते काम करायचं असं मनाशी त्यांनी नक्की केलं होतं. आर्थिक स्वयंपूर्णता हा त्यांच्यासाठी तेवढा महत्त्वाचा विषय नव्हता. तसं असलं तरी आत्ताच्या मुलींनी आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या पायावर उभं राहायलाच हवं हे त्या आग्रहाने सांगतात. निवडलेल्या क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरण्यासाठी आवश्यक ते गुण मुलगा व मुलगी हा भेदभाव न करता दोघांमध्येही असायला हवेत या जाणीवेनं त्या आपल्या मुलांच्या विकासाकडे डोळसपणे पाहतात.

## सुषमा देशपांडे

'व्हयं मी सावित्री' या एकपात्री नाट्याचे २०० प्रयोग खेडोपाडी झाले. सुषमा देशपांडे हे नाव जाऊन त्याचं नामकरण ''सावित्री'' असं झालं. अशा या सुषमा देशपांडे आहेत तरी कोण?

पत्रकार म्हणून स्वत:च्या कामाची सुरुवात केली. १५ वर्षांपूर्वी ''कोणीतरी मुलगी असं काम करते'' हे थोडंसं वेगळं होतं. धाडस आणि निर्भयता या गुणांवर त्या पुढे जात होत्या. त्यांना नुसतं बातमीदार व्हायचं नव्हतंच. त्या एक कॉलम तेव्हा लिहीत होत्या. लग्न झाल्यानंतरही ते काम तसंच चालू राहिलं. पण साचेबंद काम करण्यात त्यांना समाधान नव्हतं. सामाजिक-सांस्कृतिक बदल करू शकेल असं

काम त्यांना करायचं होतं.

देशामध्ये निरक्षर जास्त आहेत. त्यांच्यासाठी काही काम करायचं असेल तर नुसतं सदर लिहून चालणार नाही. म्हणून मग त्या चित्रपट या दृक श्राव्य (audio visual) माध्यमाकडे वळल्या. सुरुवातीचा काही काळ चित्रपट निर्मितीचं तंत्र शिकण्यासाठी काही निर्मात्यांकडे कामे केली. 'प्रसार माध्यमांचा (media) वापर सामाजिक कामासाठी कसा केला जावा?' यासंबंधी विचार सुरू होताच.

त्यांचा मुलगा, तो झाला त्यावेळी तीन वर्षे त्या घरी राहिल्या होत्या. रिकाम्या वेळात वाचन सुरू होतंच. थोर स्त्रियांचे कर्तृत्व जाणून घेण्यासाठी त्यांनी अनेक स्त्रियांची चरित्रे वाचली. त्यातच त्यांनी सावित्रीबाई फुल्यांच्या चरित्राचं वाचन केलं. मग छंदच जडला. जिथे मिळेल तिथे सावित्रीबाईंविषयी वाचत गेल्या. त्या वाचनातून सावित्री सर्वांपर्यंत पोहोचावी



असं वाटलं. अनेक नातेवाईक या तीन वर्षात चिडवायचे. 'घरी कशाला राहतेस!' असं म्हणायचे. पण याच तीन वर्षात त्यांनी ''व्हय मी सावित्री'' लिहिलं.

अंजोर थोडा मोठा झाल्यानंतर 'सावित्री' पोहोचण्यासाठी त्यांनी व त्यांच्या यजमानांनी खूप प्रयत्न केले. स्वत:चा व्यवसाय सोडून ते सुषमाताईंबरोबर हिंडले.

पैसा मिळवणं हा मुख्य हेतू कधीच नव्हता. विचार पोहोचणं महत्त्वाचं वाटत होतं. त्याविषयीचा एक प्रसंग.

अंजोर लहान होता. सावित्रीचे प्रयोग चालू होते. दिवाळी आली. अंजोर आईला म्हणाला, ''आई इतर सर्व मुलांना नवीन कपडे. मला का नाही?'' आपण खडतर आयुष्य जगतोय पण अंजोरचं काय चुकलं, त्याचा विचार करायला हवा. म्हणून मग यजमानांनी पुन्हा एकदा व्यवसाय सुरू केला.

सावित्रीची film करताना अविनाश धर्माधिकारी उभे राहिले. १४ लाख रुपये जमा करायचे होते ते त्यामुळेच करू शकल्या. कर्ज फेडण्याच्या वेळी एका राजकीय व्यक्तीने ते डोंगराएवढं कर्ज फेडायला मदत केली.

दोघांनाही अनेकदा कामासाठी बाहेर जावं लागतं. पण दोघांच्याही सहमतीने त्यांनी ठरवले की ''आपल्यापैकी एकजण तरी अंजोर बरोबर पुण्यात राहील.'' हल्ली बाबा पुण्यात असले आणि आई परगावाहून आली तर अंजोरच विचारतो, ''तुम्ही कधी निघताय बाबा?'' अंजोरला बाबांच्या हातचा स्वयंपाक जास्त आवडतो.

सासरी सुरुवातीपासूनच कोणत्याही कामाला नकार नव्हता. असता तरी तो न जुमानता त्या पुढे गेल्या असत्या. वेगळं काम करायचं हे नक्की होतं. संसारात सर्वार्थाने मदत



**प्रायोजक : कौशिक एंटरप्राईजेस, पुणे-३८.**

करणाऱ्या साथीदारामुळे 'स्वत:चा विचार पोहोचविण्याची जिद्द मी मनात बाळगू शकते' हे त्या अभिमानाने सांगतात.

## इंदुमती चिपळूणकर

''मी लग्न करणार नाही. मला समाजाची सेवा करायची आहे.'' असा निर्णय १९५० साली चिपळूणकर वाड्यात जाहीर होतो. एका लाडावलेल्या, श्रीमंतीत वाढलेल्या मुलीला परीक्षेतील गुण उत्तम असून तब्येतीमुळे डॉक्टर होता आले नाही म्हणून बी.ए. झालेली इंदुमती चिपळूणकर असा निर्णय जाहीर करते, तेव्हा मोठा भाऊ मात्र पाठीशी उभा राहतो. मैत्रिणी, नातेवाईक यांनी ''मूर्ख आहेस'' असे शेरे मारले त्याला न जुमानता आपल्या निर्णयावर ठाम असलेली इंदुमती पुढे काय करते ते पाहू.

ती गोपीनाथ तळवलकरांची मानसकन्या होती. रिमांड होममध्ये गोपीनाथजींचे एकजण ओळखीचे होते. एम.एम. जोशी म्हणून ! त्यांची परस्परांशी ओळख झाली आणि इंदुमतीताई रिमांड होममध्ये जाऊ लागल्या.

१ जानेवारी १९५६ पासून त्या रिमांडहोम मध्ये अर्धवेळ काम करू लागल्या. ही त्यांच्या कामाची सुरुवात. १९५९ साली सरकारी नोकरीत गेल्या ते Reception Center मध्ये !

त्यानंतर त्यांनी अनेक कामे केली. त्यांनी एक महत्त्वाचा सर्व्हे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या सामाजिक संस्थेतर्फे केला. खुनी महिलांचा ! तुरुंगात त्यांना महिलांशी बोलायला जाण्याची परवानगी मोठ्या मुष्कीलीनं मिळाली. तिथे एक म्हातारी त्यांना नेहमी भेटायची. त्या वृद्धेनं स्वसंरक्षणार्थ एका गावगुंडाचा खून केला होता. म्हणून तिला जन्मठेप झाली होती. ''तुम्हाला आता त्या घटनेबद्दल काय वाटतं?'' असं विचारल्यावर ती म्हणाली, ''मला त्याचा अजिबात पश्चात्ताप होत नाही. उलट मी मला व माझ्या कुटुंबाला वाचवलं.'' त्या वृद्धेचं वागणंही इतकं सभ्यपणाचं होतं की तिने खून केला आहे हे खरंही वाटणार नाही. त्यातून त्यांना समाजस्थितीचं विदारक दर्शन घडलं. असे अनेक प्रसंग इंदूताईंच्या आठवणीत आहेत.

त्या रिमांड होमच्या निरीक्षक असताना त्यांनी तेथील मुलांना पतंग, गोट्या, विट्टी-दांडू खेळायला दिले. ''आपण शाळेत गेलो नाही हे त्यांना आठवणार नाही. पण आपण खेळलो नाही हे नक्की आठवेल.'' मुलांच्या





**प्रायोजक : परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.**

बालमनाचा विचार करणाऱ्या इंदूताईंचा प्रयत्न निष्फळ गेला नाही. त्यातील काहीजण शिक्षण व व्यवसाय क्षेत्रात चमकले.

१८९० ते १९०० च्या दरम्यान महात्मा फुले व सावित्रीबाईंनी कुमारी मातांना आधार देण्यासाठी हात पसरले. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजाची ती तीव्र गरज होती आणि आजही परिस्थिती फारशी सुधारलेली नाही. इंदुताई त्यासाठी सरकारी माध्यमातून गेली ४० वर्षे सतत प्रयत्न करीत आहेत. समाजातील पोकळपणा त्यांना व्यथित करतो. सध्या त्या Juvenile Board च्या सदस्या म्हणून काम पाहत आहेत.

अशा कामात त्यांना नेहमीप्रमाणे धमक्या दिल्या गेल्या. पण निर्भयतेने त्या पुढे जात राहिल्या. आर्थिक बाबतीत त्या स्वयंपूर्ण आहेत. आपल्या मतिमंद भावाला व आता भाचे कंपनीला त्यांनी सांभाळलं.

जे धाडस इंदूताईंनी ४६ वर्षांपूर्वी दाखवलं तशा प्रकारचा धाडसी निर्णय घ्यायला नव्या पिढीतील मुलीही कचरतील. चांगल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी, तुरुंगातील कैद्यांना साधनसामग्री मिळावी म्हणून, परितक्त्या महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी त्यांनी सतत धडपड केली. एक विषय निवडून त्यावर सुरुवातीपासून काम करणं यासाठी लागणारं साहस, धैर्य मिळवणं आणि परिस्थितीला संयमाने पण खंबीरपणे तोंड देणं हे त्या काळाच्या पुढचं पाऊल होतं. सरकारी नोकरीतही सामाजिक ऋण मानून खूप काही करता येतं, हे इंदूताईंशी बोलताना जाणवत होतं.

**समारोप**

अशा या चौघी 'मुक्तांगणीच्या प्रातिनिधिक कलिका'! एक गरिबीमुळे घरादाराचा आधार बनते. दुसरी काही काळ इतरांसाठी स्वत:च्या आवडीला आपणहून मुरड घालते. त्यात काही गमावते तर काही मिळविते. तिसरी स्वत:च्या आवडीच्या क्षेत्रात मनाप्रमाणे रमत जाते. चौथी समाज हाच प्रपंच मानून स्वत:ला त्यात झोकून देऊन कार्यरत राहते. परिस्थितीवरची प्रत्येकीची उत्तरे वेगवेगळी आहेत. आर्थिक अडचण कुसुमताईंना व्यवसाय करणं भाग पाडते. पहिल्यापासून काम करत असलेल्या ज्योतीताई स्वत:हून बंधनं स्वीकारतात. तर सुषमाताई मात्र पत्रकार व्हायचं ठरवतात, तसं करून दाखवतात आणि सतत कार्यरत असणाऱ्या इंदूताईंचे व्यक्तिमत्त्व आजही मार्गदर्शक वाटते. आहे त्या परिस्थितीशी योग्य सामना करून त्यावर ठसा उमटविण्याचा प्रत्येकीचा प्रयत्न त्यांच्यातील सामर्थ्याची, स्त्रीच्या विविधांगी क्षमतांची झलक आपल्यापर्यंत पोहोचविते हे जाणून घेणे महत्त्वाचे !

येणाऱ्या काळात स्त्रियांना सर्व क्षेत्रं खुली होत आहेत. अनेक स्त्रिया आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. आत्मनिर्भरतेनं, खरीखुरी आंतरिक मुक्ती अनुभवणाऱ्या परिपूर्ण स्त्रीत्वाचा विकास हा समाजाला एका उंचीवर नेईल. या जाणीवेकडे आपलाही प्रवास व्हायला हवा. घर-दारी तसं आपण वागायला हवं तरच हा संवाद फलश्रुत होईल.

***



**प्रायोजक : डॉ. अविनाश लेले, सावित्री आयुर्वेद प्रतिष्ठान, अत्रेय रुग्णालय, एरंडवणा, पुणे.**

# डोळस भटकंती-ओळख शंखशिंपल्याची

**प्रा. प्र. के. घाणेकर**

पूर्वेला सह्याद्रीची उत्तुंग डोंगर रांग आणि पश्चिमेला असणारा सिंधुसागर यामधल्या सपाटीत जमिनीची एक अरुंद पट्टी सामावली आहे. तिला म्हणायचं कोकण. कोकणच्या रम्य समुद्रपुळणीवर भटकणं म्हणजे आनंदाची परिसीमा. पाठीशी हिरवी झाडी-तांबडी माती अन् पुढ्यात रूपेरी दर्या अन् चंदेरी वाळू. अशा या रम्य परिसरात पायाखालच्या मऊसूत रेतीत अक्षरश: अगणित शंखशिंपले आढळतात. विविध आकार, प्रकार, रंग यामुळे त्यातील चार दोन उचलून हाती घेण्याचा मोह सगळ्यांनाच होतो.

कवडी-गायली-शिंपला, काटेरीशंख, साधा शंख, मोठा शंख, बारीक शंख या व्यतिरिक्त काही आपली नामसंपत्ती जात नाही. पण पाश्चात्त्य अभ्यासकांनी जगभरातील साऱ्या शंख-शिंपल्यांचं नामकरण केलं, त्यांची वर्गवारी केली, त्यांच्या जीवनक्रमांचा अभ्यास केला, कोणते कोठे आणि केव्हा सापडतात यांची टिपणं केली, त्यावर लेख लिहिले, पुस्तकं अन् कोश तसेच रंगीत संदर्भग्रंथ तयार केले. त्यामुळे या कवचधारी सागर संपत्तीकडे डोळसपणे पाहायचं तर त्यांना दुर्लक्षून कसं चालेल? त्याहूनही अधिक महत्त्वाचं म्हणजे आपल्या अंगणात हे सारं असूनही यांचा परिचय करून देणारा ''सलिम अली'' अजूनही आपल्यात पैदा झालेला नाही. ती कामगिरी तुमच्यापैकी कोणीतरी का घेऊ नये?

शंख-शिंपल्यांबद्दलचा अभ्यास 'कॉन्कॉलॉजी' नावाने ओळखला जातो. सी-ओ-एन्-सी-एच कॉंक म्हणजे शंख.

मुंबईतील बी.एन्.एच्.एस्. या प्रख्यात निसर्ग अभ्यास संस्थेमार्फत 'हॉर्नबिल' या नावाचं एक त्रैमासिक प्रकाशित होतं. त्यामध्ये मनोज मुनी आणि कार्ल डिसिल्व्हा यांनी एक प्रदीर्घ लेखमाला १९८५ ते १९८८ या काळात लिहिली होती. त्यामध्ये प्रत्येक शंख-शिंपल्याचं रंगीत चित्र आणि थोडक्यात माहिती दिलेली आहे. या क्षेत्रात प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी अतिशय उपयुक्त असं हे काम आहे.

''जर्नल ऑफ द युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे'' या मुंबई विद्यापीठाच्या प्रकाशनात (Vol.XVII Part 5) म्हणजे मार्च १९४९ मध्ये प्रामुख्याने





**केदार देवगावकर याच्यावतीने छात्र प्रबोधनच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !**

शिंपल्यांबद्दल आणि (Vol.XVII Part 5) म्हणजे नोव्हेंबर १९५२ मध्ये डॉ. के. आर. करंदीकर, एन्.एन्. मूर्ती आणि टी.व्ही. सुब्रह्मण्यम यांनी प्रदीर्घ अन् सचित्र लेख लिहून २६८ शंख-शिंपल्यांची ओळख पटवून घेण्यास उत्तम मार्गदर्शन केले आहे.

इंग्लिशमध्ये शंख शिंपल्यांबद्दल अनेक लहानमोठी रंगीत माहितीपूर्ण पुस्तके किंवा मार्गदर्शक उपलब्ध आहेत. त्यांचा जागतिक आवाका असल्याने खास भारतीय किंवा महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आढळणाऱ्या शंखशिंपल्यांबद्दल तपशीलाने माहिती मिळवणं आणि त्यांची ओळख पटवणं थोडं अवघड होतं.

महाराष्ट्र अन् गोव्याला सुमारे हजार किलोमीटर्स लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. दमण ते कारवार या किनारपट्टीतील महत्त्वाची ठिकाणं निवडून कोणत्या जागी कोणते शंख-शिंपले केव्हा मिळतात? याचा अभ्यास अद्याप झालेला नाही. तो होणं गरजेचं आहे. अशा तपशीलवार अभ्यासातून काही नव्या जाती-प्रजाती देखील उजेडात येऊ शकतील. परंतु अशा विज्ञान सामग्रीची निर्मिती कोणीतरी करेल अन् तोवर आपण वाट पाहू ही वृत्ती काही बरी नाही.

या अभ्यासाचा नक्की काय उपयोग आहे? त्यातून काही आर्थिक फायदा होईल का? इतर काही फायदे पदरात पडतील का? हे प्रश्न गैरलागू आहेत. अभ्यासासाठी अभ्यास हेच महत्त्वाचे. आपल्या अभ्यासाचा पुढे मागे काही उपयोग होईलही, कोणी सांगावे?

संगणक म्हणजे कॉम्प्युटर्स, जैवतंत्रज्ञान म्हणजे बायोटेक्नॉलॉजी, अंतराळ विज्ञान म्हणजे स्पेस सायन्स यांच्या जमान्यातही या मुलभूत अभ्यासांचं वेगळं स्थान आहे. त्या अभ्यासालाही उत्तेजन मिळायला हवं. त्यासाठी सागर किनारी भटकणाऱ्यांनी डोळे उघडे ठेऊन पाहायला हवं.

याच संदर्भात फ्रेंड्स ऑफ ॲनिमल्स संस्थेच्या 'आपली सृष्टी आपले धन', 'प्राणीसृष्टी भाग १' हे डॉ. म. वि. आपटे यांचे पुस्तक, 'महाराष्ट्राची प्राणीसृष्टी भाग १' हे प्रा. संजीव नलावडे यांचे पुस्तक निश्चितच उपयोगी पडू शकेल.

समर्थ रामदास स्वामींच्या लिखाणात याबद्दलची जिज्ञासा चाळवणारे काही संदर्भ येतात ते असे

कोसले अथवा काटेघरे,
नानापृष्ठी चालती घरे।
जीव करिती लहानथोरे,
शक्तीनुसार।।
शंख, सिंपी, घुला, कवडे,
आधी त्यांचे घर पडे।
किंवा आधी किर्माण किडे,
हे आधी विचारावे।।

***



**प्रायोजक : नातू चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे.**

# आम्ही चितोर युवती-क्रीडा प्रात्यक्षिके

**अनघा कुकडे लवळेकर**

२१ जानेवारी ९६ चा दिवस! सकाळपासूनच चैतन्याच्या लहरी ज्ञान प्रबोधिनीमध्ये इकडून तिकडे लगबगा धावत होत्या. तशा त्या जवळजवळ गेला महिनाभर प्रबोधिनीच्या वास्तूत आणि स्काऊट ग्राऊंडवर निरनिराळ्या रूपात झळकत होत्या. कधी काठेवाडी घोड्यावर स्वार होताना (अर्थात काठीच्या) तर कधी भिंतीवरून उतरताना, कधी दोराच्या मल्लखांबावर लवलवताना, तर कधी जळत्या लेझिमांना पेलताना, आगीतून उड्या मारताना लोकांचं लक्ष खेचून घेत होत्या. थबकायला लावत होत्या.

'काय आहे तरी काय हा प्रकार?' असा प्रश्न सगळ्यांनाच पडत होता. विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी युवती विभागातर्फे २१ जानेवारीला जी क्रीडा प्रात्यक्षिके सादर होणार होती, त्याचा हा सराव होता.

ज्ञान प्रबोधिनी युवती विभाग सुरू झाला तोच 'स्त्री शक्ती प्रबोधनाचा' मूलमंत्र जपत. हे शक्तीचं प्रकटन तन, मन आणि बुद्धी ह्या तीनही अंगातून करण्याचा उद्देश मनात धरून युवती विभाग उपक्रमांची योजना करत राहिला. शक्ती जशी व्यक्तीची तशीच संघटनेचीही असते. म्हणून शारीरिक शक्तीची आराधना एकेकट्यानं करता करता सांघिक रूपानं, संघटित रूपानं करण्याचा विचार रुजला. त्यातूनच कल्पना निघाली. 'क्रीडा प्रात्यक्षिकांची.'

अजूनही आपल्याकडे शालेय आणि आंतरशालेय स्पर्धा वगळता अशा प्रकारची 'मुक्त क्रीडा प्रात्यक्षिके' करण्याची कल्पना तितकीशी रुजलेली नाही. त्यातून या प्रात्यक्षिकांमध्ये जे अनेक धाडसी, साहसपूर्ण क्रीडा प्रकार असतात ते मुलींनी करावेत की न करावेत यावर बरेच मतभेद आहेत. गेल्या पाच वर्षात झालेल्या तीन क्रीडा प्रात्यक्षिकांना मात्र पालकांचा आणि प्रेक्षकांचा अत्यंत उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसाद मिळतो आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके सादर करण्याचा आणि त्यातून अधिकाधिक युवतींना बलसंपन्न, आत्मविश्वास-संपन्न बनण्याचा वसा देण्याचं उद्दिष्टही समोर धरतं आहे.

यंदाही सुमारे ३०० प्रबोधिकांची क्रीडा प्रात्यक्षिकं न्यू इंग्लिश स्कूलच्या (टिळक रोड) मैदानावर सादर झाली. दीड तास सुमारे पाच हजार प्रेक्षकांना खिळवून ठेवून विविध प्रकारची कौशल्यं मुलींनी सादर केली. विशेष म्हणजे पुण्याच्या ज्ञा. प्र. प्रशालेतील मुलींच्या बरोबरच या वेळी, अन्य प्रशालांमध्ये युवती कार्यकर्त्या वर्षभर ज्या तासिका घेतात त्यात सामील होणाऱ्या युवतींचा एक मोठा गट सहभागी होता. अजून आश्चर्याची आणि आनंदाचीही गोष्ट म्हणजे सासवड येथील केंद्रातील आणि शिवापूर येथे चालणाऱ्या किशोरी विकास प्रकल्पातील ग्रामीण



**श्री. राजेंद्र कानडे यांच्याकडून उत्तमतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रबोधकांना शुभेच्छा !**

मुलींचाही उत्साहपूर्ण सहभाग दिसत होता.

सुरुवात झाली ती भगिनी निवेदितांच्या पुण्यस्मरणाने ! धैर्याची, ज्ञानाची आणि समर्पणाची मूर्ती असलेल्या निवेदितांना पुष्प अर्पण करून एका पद्यातून वंदन करण्यात आलं. त्यानंतर दहावीच्या मुलींचा घोष कडकडू लागला. त्या लयबद्ध ठेक्यावर संचलनाचा गट मैदानावर आला. 'संगच्छध्वं-संवदध्वं' - एक दिलाने, एकमुखाने, एक दिशेने जाण्याचं प्रतीक म्हणजेच संचलन. ही प्रारंभीची सलामी संपल्यावर मग प्रत्यक्ष क्रीडा प्रकारांना प्रारंभ झाला.

काही क्रीडा प्रकार स्नायूंच्या लवचीकतेवर, चिकाटीवर भर देणारे होते. योगासने, जिम्नॅस्टिक्स, सर्वांगसुंदर व्यायाम यामध्ये संगीताच्या ठेक्यावर विविध रचना करत मुलींनी हे प्रकार सादर केले. योगासनांमध्ये जवळजवळ वीस आसनांचा समावेश होता. त्यातच पद्ममयूरासन हे अतिशय अवघड आसनही त्यांनी लीलया केलं. योगासनांमुळे शरीर लवचीक होतंच. पण त्याचबरोबर चित्ताची एकाग्रता वाढायलाही मदत होते.

जिम्नॅस्टिक्समध्ये अगदी सोप्या सोप्या उड्यांपासून सुरुवात करत. काही अवघड प्रकार (उदा. split) हे एकेकटीनं आणि गटागटांनी एकत्र करून दाखवले.

सर्वांगसुंदर व्यायामाचा गट सर्वांत मोठा होता. सुमारे एकशेवीस मुली यात सामील होत्या. पांढरेशुभ्र हातमोजे आणि पायमोजे घालून केलेल्या हलक्या फुलक्या हालचाली सगळ्याचं लक्ष वेधून घेत होत्या.

वाढत्या शहरीकरणामध्ये 'स्वसंरक्षण' करता येणं, ही आजच्या मुलींकरता एक अत्यंत आवश्यक बाब बनली आहे. स्वसंरक्षणाच्या अनेक प्रकारांचं चित्तवेधक प्रदर्शन मुलींनी केलं. वरवर निरूपद्रवी दिसणाऱ्या आयुधांपासून अगदी चाबूक आणि लाठ्यांपर्यंत विविध हत्यारं त्यांनी सहजपणे पेलून दाखवली. नानचक्कू (मार्शल आर्ट्स मधील एक आयुध) चा वेगवान वापर करून 'समोरच्या शत्रूला (काल्पनिक!) आपल्यापर्यंत पोचूच देणार नाही' अशा







**श्री. राजेंद्र कानडे यांच्याकडून छात्र प्रबोधनच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा !**

आवेशानं त्यांनी हे प्रकार सादर केले. सगळ्यात लक्षवेधी ठरलं वेत्रचर्म! ढोल ताशाच्या कडाडणाऱ्या संगीत पार्श्वभूमीवर युद्धाला सज्ज झालेल्या मराठा सैनिकाच्या पोशाखात एका हातात वेत्र आणि दुसऱ्या हातात चर्म (ढाल) घेतलेल्या मुली जेव्हा रिंगण घेत, पवित्रा घेत झेपा टाकत मैदानात आल्या तेव्हा सर्वांनीच आपले श्वास रोखून धरले. या सर्वच प्रकारात प्राथमिक हालचालींपासून द्वंद्व (दोघांचं युद्ध) ते हल्लाफोड (एकाच वेळी ७/८ जणांशी लढणं) असे सर्व प्रकार दाखविण्यात आले. अशी संरक्षण तंत्रं आत्मसात केलेल्यांच्या वाटेला जाण्याची कुणाची बिशाद आहे? असा प्रश्न वाटावा इतकं जिवंत प्रात्यक्षिक या युवतींनी सादर केलं.

सुदृढ शरीराच्या वैशिष्ट्यांमध्ये लवचीकता, ताकद या बरोबरच समावेश होतो संतुलनाचा (Balance). मनोरे, सायकल कसरती आणि काठीचे घोडे या क्रीडा प्रकारांमध्ये या युवतींनी आपली चपळाई आणि संतुलनाचा सुरेख मेळ घालून दाखवला. मानवी मनोरे रचतानासुद्धा अत्यंत गतीनं हालचाली करत २ मजली-३ मजली आणि चार मजली मनोरे त्यांनी करून दाखवले. यातलाच एक नावीन्यपूर्ण प्रकार म्हणजे झुलता मनोरा. पायाच्या दगडांना एरवी इमारतीच्या सौंदर्याचे भागीदार नाही ठरवलं तरी असे मनोरे बघताना त्यांच्या भक्कमतेची, स्थिरपणाची आणि गाडून घेण्याच्या आवश्यकतेची खात्री पटते.

सायकल कसरतींचं प्रात्यक्षिक तर सर्वांना एकाच वेळी चकित करणारं आणि मोहून टाकणारं होतं. पुण्यातल्या दुचाकी-स्वारांच्या एकूणच कौशल्यांना दाद मिळावी असंच ते प्रात्यक्षिक होतं. एकाच वेळी दोन (चालणाऱ्या) सायकलींवर पाय ठेवून तोल सांभाळणारी युवती असेल किंवा सायकल चालवणाऱ्या मैत्रिणीसमोर दांडीवर झोपून चक्क तिच्याशी गप्पा मारणारी दुसरी युवती असेल, या सगळ्याच अनोख्या प्रकारांनी प्रेक्षकांना दंग करून टाकलं. अर्थातच सराव करताना कदाचित थोडी पडझड झाली असणारंच; पण प्रत्यक्ष त्या दिवशी मात्र अगदी अचूकपणे आणि नियोजनाप्रमाणे सर्व साधत हा प्रकार सादर झाला.

सगळ्यांना अजून धक्का बसला तो शिवापूरच्या काठीनृत्यामुळे. जमिनीवर चालताना ठेच लागून पडणं नित्याचंच आहे. पण उंच काठीला ठोकलेल्या पट्ट्यांवर (दोन फूट उंचीवर) पाय ठेवून चालणं, पळणं, पायऱ्या चढणं, उतरणं, इतकंच काय चमचा लिंबू शर्यत आणि अडथळ्यांची शर्यतही ह्या मुलींनी करून दाखवली तेव्हा ह्या ग्रामकन्यांच्या अदाकारीला प्रेक्षकांनी भरघोस दाद दिली. त्यांच्या सर्वच हालचालीत इतका सहजपणा होता की ह्या काठ्या नसून दोन जादा फुटलेले पायच असावेत असं वाटावं!


*'आहे ज्वालांशी फुलांशी प्रखर कोमल नाते*
*आहे तेजस्वी संयत आमुच्या खड्गाचे पाते'*




**कै. प्रतापमल शिवराम जैन, पोयनाड यांच्या स्मरणार्थ नवरतन प्रतापमल जैन यांच्याकडून शुभेच्छा !**

असं म्हणत या युवती जळतं लेझिम, जळत्या बोथाट्या घेऊन नृत्य करू लागल्या तेव्हा अग्निफुले माळून नाचणाऱ्या दुर्गेचीच आठवण झाली. जाळातून उड्या मारताना जे धाडस, जो आत्मविश्वास त्यांनी कमावला आहे तो कितीही दुर्धर, धगधगत्या प्रसंगातून निभावून यशस्वी होण्याची जिद्द देणारा आहे हे निश्चित.

यानंतर प्रात्यक्षिकांचा समारोप झाला तो बघणाऱ्यांच्याही अंगात सुरसुरी आणणाऱ्या जोशपूर्ण बरची नृत्यानं. तासाभराच्या कठीण-दमवणाऱ्या प्रात्यक्षिकांनंतरही अत्यंत जोशात, वाद्यांच्या तालात युवतींनी बरची नृत्य केलं. चेहऱ्यावरून जरी घाम ओघळत असला तरी मनामध्ये मात्र उत्तम प्रदर्शनाचा आणि त्यातून मिळालेल्या समाधानाचा आनंद साठलेला होता.



यानंतर मा. संचालकांचं वैचारिक झालं. 'प्रबोधिनी ही सर्वांची आहे. सर्वांना इथले दरवाजे उघडे आहेत. इथले साठलेले अनुभवांचे, प्रयोगांचे धन सर्वांपर्यंत पोचवायचे आहे.' सर्वच शिक्षकांना, शिक्षणसंस्थांच्या चालकांना त्यांनी आवाहन केलं की, 'अशाप्रकारची क्रीडा प्रात्यक्षिकं जिल्ह्याजिल्ह्यात, गावागावात व्हायला हवीत. हा झरा झिरपत सर्वदूर पसरायला हवा. प्रबोधिनी त्याकरिता सहकार्य करायला सदैव तत्पर आहे.'

क्रीडा प्रात्यक्षिकांच्या या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष प्रदर्शनापेक्षाही त्याकरिता या सर्व युवतींनी केलेले अविश्रांत परिश्रम अधिक मोलाचे आहेत. विविध महाविद्यालयातील ज्या २५ युवतींनी हे प्रकार बसवून घेतले, संगीतापासून सादरीकरणापर्यंतचं हे आव्हान अत्यंत कुशलतेनं पेललं आणि संघटित क्रीडाशक्तीचा हा प्रत्यय दिला, त्या युवतींची लगन आणि गुंतवणूक अधिक समाधान देणारी आहे. प्रात्यक्षिक होण्यापूर्वी, करताना आणि झाल्यानंतरही जणू काही या मनोमन म्हणताहेत,

***ज्वाला जशा उसळती वर जावयाते***
***ध्येये तशीच अमुची असू देत माते***
***ही इंधने तळपती अतिरिक्त वर्णे***
***सारे प्रयत्न अमुचे प्रतिसूर्यबिंबे!***

***



**कै. प्रतापमल शिवराम जैन, पोयनाड यांच्या स्मरणार्थ नवरतन प्रतापमल यांच्याकडून शुभेच्छा !**

# असे हे गणित

**डॉ. जयंत नारळीकर**

## काही कूट प्रश्न


गणित म्हणजे आकडेमोड हे समीकरण तयार झाले आहे ते वास्तविक चुकीचे आहे. खालील पाच कूट प्रश्न सोडवून पाहा... त्यात आकडेमोडीपेक्षा तार्किक युक्तिवादाला जास्त महत्त्व आहे.

### १) बुद्धिबळाचा पट आणि डॉमिनो

8 × 8 वर्गांचा बुद्धिबळाचा पट तुम्हाला परिचयाचा आहे. अशी कल्पना करा की त्याच्या एका कर्णाच्या टोकाचे दोन वर्ग कापून टाकले. (चित्र पाहा.)

आता तुम्हाला एक डॉमिनोचा तुकडा दिला आहे. ज्याचा आकार आणि व्याप बुद्धिबळाचे दोन लहान वर्ग झाकेल इतका आहे.

**तर प्रश्न असा** ह्या डॉमिनोद्वारे क्रमाक्रमाने सर्व वर्ग व्यापता येतील का? मात्र कुठलाही वर्ग एकाहून जास्त वेळा झाकायचा नाही. शक्य असेल तर झाकायची रीत दाखवा.




जर अशक्य असेल तर तसे सिद्ध करून दाखवा.

### २) हुशार विक्रेता

एक विक्रेता घरोघरी जाऊन पुस्तके विकत असे. एका घरी त्याला तेथील गृहिणीने कोडे घातले. ती म्हणाली ''हे कोडे सोडवलेस तर मी काहीतरी विकत घेईन.''

''सांगा बाईसाहेब, मलाही कोडी सोडवायला आवडतात.'' विक्रेता म्हणाला.

''मला तीन मुली आहेत.'' बाईसाहेब म्हणाल्या. ''त्यांच्या वयाचा गुणाकार ३६ इतका आहे आणि वयांची बेरीज शेजारच्या घराच्या नंबरा इतकी आहे. तर ती वये सांग.''

विक्रेता शेजारच्या घरचा नंबर पाहून आला. त्याने एका चिटोऱ्यावर काही गणित केले आणि म्हणाला ''बाईबाहेब प्रश्न सोडवायला अजून माहिती पाहिजे.''

बाईसाहेब ज्ञान प्रबोधिनीत गणित शिकलेल्या होत्या. त्यांनी थोडा विचार करून म्हटले ''तुझे म्हणणे बरोबर आहे. आणखी माहिती देते. माझी सर्वांत मोठी मुलगी छान पेटी वाजवते.''

विक्रेता विजयी मुद्रेने म्हणाला ''मग तुमच्या मुलींची वये आहेत...'' त्याचे उत्तर बरोबर होते. तुम्ही सांगू शकता त्या मुलींची वये?

### ३) मावशी आणि काकी

प्राची जोग खोपोलीत मुंबई-पुणे महामार्गाजवळ राहत असे. दर रविवारी सुट्टीला ती मुंबईला मावशीकडे किंवा पुण्यातल्या




*With Best Compliments From* JAISONS ENGINEERING TECHNOLOGY, PUNE.

काकीकडे जात असे. मावशी काकी दोघी तिचे लाड करायच्या आणि त्यांच्या बाबतीत पक्षपात नको म्हणून ती केव्हाही उठून रस्त्यावर उभी राही. मुंबई आणि पुण्याकडे जाणाऱ्या एस.टी. बसेसचे स्टॉप समोरासमोर होते. जी बस आधी येईल ती



पकडायची असा तिचा नियम असे. पुण्याची बस आधी आली तर काकीकडे जायचे आणि मुंबईची आली तर मावशीकडे.

दोन्ही बसगाड्या वेळापत्रकानुसार तासातून एकदा खोपोलीतून जात. प्राची वेळापत्रकात न पाहता कुठल्याही वेळी स्टॉपवर जात असे. तरी दहा रविवार अशा ट्रिपा केल्यावर तिला आढळून आले की ती नऊ वेळा काकीकडे आणि एकदाच मावशीकडे गेली.

असे का झाले?

### ४) वीस व्रात्य मुले

प्रबोधिनीच्या संचालकांनी पालकांना पत्र पाठवले. ''शाळेत काही अतिशय व्रात्य मुले आहेत. ती कोणती हे सांगत नाही. पण व्रात्य मुलांच्या पालकांनी आपापल्या पाल्याला समज द्यावी आणि ताबडतोब शाळेला कळवावे.''

वास्तविक स्थिती अशी होती. एकूण वीस मुले व्रात्य होती. प्रत्येक पालकाला इतरांच्या मुलांच्या व्रात्यपणाबद्दल माहीत होते. पण आपल्या पाल्याबद्दल खात्री नव्हती. संचालकांचे पत्र मिळताच सर्वजण सावध झाले आणि विचार करू लागले.

दुसऱ्या दिवशी व्रात्य मुलांना शिक्षा होईल अशी मुख्याध्यापकांना अपेक्षा होती. पण तसे घडले नाही. तिसऱ्या दिवशी पण काही झाले नाही.

''पालक मंडळी फार निष्काळजी दिसतात,'' मुख्याध्यापक संचालकांना म्हणाले. ''त्यांनी पोरांना लाडावून ठेवले आहे.''

''जरा दमाने घ्या !'' संचालक स्मित करत म्हणाले, ''सर्व पालक मंडळी विचारवंत आहेत. तसेच स्वत:च्या पाल्याबद्दल इतर पालकांना विचारणे त्यांना कमीपणाचे वाटते.''

''मग स्वस्थ बसून ते हा प्रश्न कसा



**मंदार देवगावकरतर्फे प्रबोधकांना बलसंपन्न व आरोग्यपूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा !**

सोडवणार?''

''तीच गंमत आहे! वीस दिवसात त्यांची खात्री होईल.'' संचालक म्हणाले.

आणि त्यांचा तर्क खरा ठरला. फतवा निघाल्यापासून वीस दिवसांनी त्या वीसही व्रात्य मुलांना त्यांच्या पालकांनी योग्य ती शिक्षा केली.

पालक वीस दिवस का थांबले?

**५) विचित्र विमानसेवा**

एका देशात पुष्कळ शहरे विमानसेवेने जोडली होती. पण पेट्रोल महागल्याने काटकसर करण्यासाठी सरकारने फतवा काढला की प्रत्येक शहरापासून फक्त एकच विमान निघावे आणि तेही सर्वात जवळच्या शहराकडे ! हा फतवा चक्रमपणाचा होता यात शंका नाही... कारण निघालेले विमान परत त्याच शहराकडे परत येईल अशी खात्री नव्हती.

पण ह्या नियमाप्रमाणे हे सिद्ध करा की जास्तीत जास्त पाच विमाने एखाद्या शहराकडे येऊ शकतील. कुठली ही दोन शहरे त्याच अंतरावर नाहीत हे गृहीत धरावे.

प्रश्न सुटले नाहीत तर उत्तरांसाठी ह्याच अंकात वेगळ्या ठिकाणी पाहा !

**हजरजबाबीपणा** राजकीय नेत्यांचा हजरजबाबीपणा आणि विनोद याविषयीचे काही किस्से आपण गेल्या अंकात वाचलेत. असाच एक किस्सा मध्यप्रदेशातील प्रसिद्ध कवी बालकवी बैरागी यांचा.

एकदा कवी बालकवी बैरागी एका मंत्री महोदयांकडे बसले होते. त्यामुळं मंत्री महोदयांनाही खूप बरं वाटत होतं. त्यांच्यावर थोडंसं इंप्रेशन मारण्यासाठी ते मंत्रीमहोदय हाताखालच्या मंडळींना वारंवार झापत होते. विशेषत: पट्टेवाल्यांनाही ओरडत होते. कुणाच्याही हालचालीत त्यामुळे काहीच फरक पडत नव्हता. उलट अत्यंत संथगतीनं कामं होत होती. मंत्री महाशय पुन्हा पुन्हा ओरडत होते, ''अरे जल्दी करो, चाय पानी लाओ। मेहमान बैठे हैं, देर हो रही है'' वगैरे वगैरे. पण स्टाफला ढीम्म फरक पडत नव्हता. ते सारं पाहून गालातल्या गालात हसत होते ते बालकवी बैरागी. त्यांना त्या साऱ्या प्रकाराची खूपच गंमत वाटत होती.

कामात न पडणारा उरक बघून बालकवी बैरागी त्या मंत्री महोदयांना म्हणाले, ''साब आप इन को बार बार डाट रहे हो ! आप के स्टाफ को क्या लगता होगा!'' त्यावर ते मंत्री महोदय म्हणाले, ''उनको क्या लगता होगा! उनको बुरा लगना चाहिये !! उनको जो मैं डाट रहा हूँ !!!'' त्यावर बालकवी बैरागी पुन्हा हसले आणि म्हणाले, ''साब मैं बताऊँ ! उनको क्या लगता होगा !!'' त्यावर मंत्री महोदय म्हणाले, ''हां, हां बताइये ! उनको क्या लगता होगा !!'' त्याच्या उत्तरादाखल बालकवी बैरागी म्हणाले, ''साब, आप के स्टाफ को लगता होगा एक टेंपरवारी आदमी दम देता है हमारे जैसे परमनंट स्टाफ को !'' त्यावर ते मंत्री साहेब आणि बालकवी बैरागी दोघंही खळखळून हसले. कारण नोकरीत कायम झाल्यावर येणारा उद्दामपणा बालकवींनी फार सहजपणानं वर्णन केला होता.

**– डॉ. विश्वास मेहेंदळे**



**व्हिडिओकॉन व्हि. सी. आर. लि. तर्फे प्रबोधकांना शुभेच्छा !**




 *वाकल्याच झाडांच्नया फांद्या तर हिरवं वस्त्र ल्यायचं असतं; नदीनं फक्त वाहायचं असतं.*

**प्रायोजक : बजेट कन्स्ट्रक्शन्स, १०२, वीरशांती, क्रांती चौक, औरंगाबाद.**

# ‘चिमा आजी’

**ज्योत्स्ना देवधर**



चिमा आजी फार देवभक्त होती. अंधश्रद्ध होती. काहीही बरं वाईट झालं तरी देवानं केलं म्हणायची. घरात चोरी झाली तरी, देवाची इच्छा. जाऊ दे, गंगार्पण म्हणायची. आजीनं आपल्या मुलांची नावं पांडुरंग, श्रीकृष्ण, घनश्याम अशी ठेवली. तर मुलींची सीता आणि सावित्री. आजोबा देवाघरी गेले. आजी म्हणाली मी पण त्यांच्याबरोबर देवाघरी जाणार, सती जाणार. देवाची तशीच इच्छा असावी म्हणून असं विपरीत झालं. तिच्या मुलांनी, मुलींनी तिला त्या दिवशी कोंडून ठेवलं. सती जाण्याची पद्धत फार जुनी झाली. आता कायद्यानं सती जाण्याला बंदी आहे, असं खूप समजावलं पण आजी ऐकेनाच. मी देवाचा कायदा मानणार असा हट्ट धरून बसली तेव्हा मुलांनी तिला कोंडून ठेवलं.

चिमा आजीनं अन्न पाणी वर्ज्य केलं. पण शेवटी सगळ्यांचं ऐकलं. जेवू-खावू लागली. पण तेव्हापासून आजीच्या मनात एकच गोष्ट घोळत राहिली. आपण देवाचं ऐकलं नाही आता प्रायश्चित्त करायला हवं.

आजीची नातवंड मोठी झाली. आजच्या जमान्यातल्या या शाळकरी मुलांना विज्ञानाचे शोध कळत होते. श्रद्धा-अंधश्रद्धा यातला फरक कळत होता. त्यांचे नाना जाती-जमातीतले मित्र होते. मैत्रिणी होत्या. ते घरी येत. एकत्र खात. मजा करत.

आजीचं डोकंच फिरायचं. ती आपली देवाजवळ बसून राहायची. ‘देवा माझ्या नातवंडांना सुबुद्धी दे’ म्हणायची. आजीच्या सुना-मुलं पण आजच्या जमान्याला धरून वागायची. आजीच्या देव-देव करण्यामुळे घरातल्या सगळ्यांचा देवावर रागच होता. नातवंड तर आजीची चेष्टाच करायची. आजीला न आवडणारं असं वागायचे, मग म्हणायचे ‘आजी आमच्या देवानं आम्हाला असं वागायची परवानगीच दिली आहे.’

नातवंडांच्या तोंडची भाषा, त्यांचं वागणं, कपडे, खेळ, खाणं-पिणं, वाटेल त्या मुला-मुलीत मिसळणं आजीला अजिबात आवडायचे नाही. तिचं सोवळं-ओवळं तर पार गुंडाळलं गेलं होतं. सून-मुलगा पण आपल्या मुलांच्या पद्धतीनं वागायचे.

‘पांडुरंगा मला पंढरपूरला नेऊन पोहोचव.



**सौ. ओटीबाई हिम्मतलालजी ओसवाल यांच्याकडून प्रबोधकांना शुभेच्छा !**



मी तिथेच राहते. हा भ्रष्टाचार मला सहन होत नाही.' चिमाआजी आपल्या थोरल्या मुलाला म्हणाली.

मुलानं-सुनेनं तिला पंढरपूरला पोहोचवली. तिची तिथे नीट सोय लावली. तिचा दर महिन्याचा खर्च एकेक मुलगा करणार होता.

दिवस जात होते. खरं तर आजी आपल्या देवाच्या गावी येऊनही सुखी नव्हती. तिला भरल्या घरात राहायची सवय झाली होती. भोवताली नातवंडांचा वावर असायचा. त्यांची भांडणे, गाणी, हट्ट-खेळ, हसणे-गमती-जमती यामुळे आजीचा दिवस कुठल्याकुठे संपायचा. सुनेचा झकपक पोषाख तिच्या कपड्यांवरून येणारा सुगंध, मुलांचं धंद्यानिमित्त फोनवर बोलणं, सतत ये-जा हे सगळं फार सुखाचं होतं असं आजीला एकटे राहायला लागल्यावर लक्षात आलं. तिला आपल्या गोजीऱ्या हसऱ्या नातवंडांची फार आठवण यायची. टी.व्ही. वरच्या त्या बायका-पुरुष मुलं, मोठाले बंगले, गाड्या, फुलं पानं पाहून आजीची खूप करमणूक होत होती. इथे टी.व्ही. नव्हता. आपण मुलांवर रागावतो पण आपल्यालाही टी.व्ही. बघायची सवय झाली आहे खरी. त्यातली घाणेरडी दृश्यं, खून-मारामाऱ्या, रक्ताचे पाट पाहून आजीला मळमळायला लागायचं; पण तेच नातवंडं अगदी रंगून पाहत राहायची. सुनेला मुलाला त्याचं काही वाटायचं नाही. सून तर म्हणाली, 'असंच आहे आत्ताचं जग. मुलांना मोठेपणी हे सगळं घाणेरडं जग, दुष्ट राजकारण,



**१० वी व १२ वीतील प्रबोधक मित्रमैत्रिणींना हार्दिक शुभेच्छा ! कु. गौरी वर्मा, धुळे.**

गुंडगिरी अशा गोष्टींना तोंड द्यावंच लागणार आहे. मुलांना शाळेत स्त्री-पुरुष नात्यासंबंधी, जन्म प्रक्रियेसंबंधी शिकवतातच...'

असं काही बाही बोलत राहिली. आजीला वाटत होतं पळून जावं, मरून जावं... पण पंढरपूरला आल्यावरही ते गाव फक्त विठ्ठलाचं राहिलं नव्हतं. त्या गावांनाही शहरी अवकळा आलीच होती. भक्त कमी, ढोंगी जास्त, दान-धर्म नाहीच, लूट मार जास्त, पूजा-अर्चा नावापुरती, देवाच्या नावावर पैसा उकळण्याच्या नाना तऱ्हांना मात्र ऊत आला होता.

एके दिवशी आजी विठ्ठलाच्या मंदिरात बराच वेळ बसून राहिली. काय काय आठवत राहिलं. नवऱ्याची, आपल्या सासू-सासऱ्यांची, दीर-नणंदांची आठवण तिला येत राहिली. त्यांनी आपला किती छळ केला हे परत अनुभवत राहिली. त्यामुळेच की काय आपण देवाला शरण गेलो. देवावर भरवसा टाकून सासुरवास सोसत राहिलो. पण या देवानं आपल्यासाठी काय केलं...? अचानक कधी नव्हे तो हा विचार चिमा आजीच्या मनात आला आणि ती कावरी-बावरी झाली.

आजी आपल्या खोलीत परतली. लक्षात आलं, तेवढ्या वेळात कुणीतरी आजीचं सर्व सामान-सुमान चोरून नेलं होतं. चिमाआजीला एकदम भयंकर एकाकी वाटलं, आपण अगदी अनाथ, असहाय, दुर्बल आहोत असं वाटलं. आजीनं ठरवलं परत आपल्या मुला-बाळात जाऊन पडायचं. सून-मुलगा-नातवंडं यांच्या बरोबर, मुख्य म्हणजे नव्या विचारांबरोबर जगायचं. देव आपल्या मनात ठेवायचा. देवपण आपल्या आचरणात ठेवायचं. आपल्या विचारात, आपल्या वृत्तीत, कृतीत करुणा ठेवायची. इकडे आपण हट्टा-हट्टानंच आलो. मुलानं पण इकडे आणून टाकलं. त्यांना आपण नको असलो तर? तरीही जायचं.

त्या रिकाम्या खोलीत चिमाआजी अंधारातच बसून राहिली. देवाला हाका घालत राहिली.

'आजी अंधारात का बसलात?' दाराबाहेरून कुणीतरी विचारत होतं. आजी दारात आली. पाहिलं तर एक सात्त्विक, तेजपूर्ण असा पुरुष उभा होता.

'काय सांगू बाबा सगळं चोरीला गेलं. बसलेय चिंता करत.'

'आजी माझ्या घरी चला. फार लांब नाही, जवळच माझं घर आहे. बायको आहे, तुमच्या वयाची आई आहे. चला.'

'पण...?'

'हो, ओळख पाळख नाही हे खरं पण आज श्रावणी सोमवार-आईनं सोमवारची कहाणी वाचली म्हणाली, 'जा पुत्रा जा. शेजारी पाजारी कुणी एकटं-दुकटं, उपाशी तापाशी असलं तर घेऊन ये. या गल्लीत आलो तर तुमच्याच घरात अंधार दिसला म्हणून हाक घातली. चला उपाशी असाल.

आजी त्या गृहस्थाबरोबर त्याच्या घरी आली. त्याच्या बायकोनं पाय धुवायला पाणी दिलं. त्याच्या आईनं केळीच्या पानावर मोठ्या अगत्यानं जेवायला वाढलं...

*घातलीच कोणी शीळ तर त्याच्यासोबतच गायचं असतं, अन्यथा नदीनं फक्त वाहायचं असतं.*



**'छात्र प्रबोधन' मासिकासाठी जाहिराती मिळवून द्या. दर अर्धे पान रु. ९००/- पूर्ण पान रु. १,५००/-**

चिमा आजीला वाटलं, हेच पंढरपूर ...आपण शोधत होतो तेच हे देऊळ...

''नातवंड नाही दिसत?'' चिमाआजीनं विचारलं.

''देवाची ती इच्छा दिसत नाही. ईश्वरेच्छा.'' घरची धनीण म्हणाली.

''आजी माझ्या सुनेला आशीर्वाद द्या. माझा वंश वाढू दे...''

आजीनं समोर वाकलेल्या सुनेला जवळ घेऊन मनापासून आशीर्वाद दिला... ''आई हो...अशाच घरात देव जन्माला येत असतो...''

''आजी उद्या तुम्हाला तुमच्या लेकाकडे जाण्यासाठी एस.टी.त बसवून देतो. जा आपल्या मुलाजवळ रहा... नशीबवान आहात...'' गृहस्थ म्हणाला.

इकडे चिमाआजी पंढरपूरला गेल्यापासून नातवंडांना पण आजीची आठवण येत होती. सुनेला पण सासू घरात होती, तर केवढा आधार होता याची जाणीव झाली होती. मुलं तर सारखी 'आजीच्या हातचा स्वयंपाक किती छान असायचा म्हणून जेवताना एकेक पदार्थाचं नाव घ्यायची. शाळेतून आल्यावर आई घरी नसली तरी आजी छान-छान गरम-गरम आवडीचा पदार्थ करून घालायची वर कप बशी पण स्वत:च धुवायची, टेबल पुसायची. आता आई सारखी कामं सांगते म्हणूनही आजीची वाट पाहत होती. चिमा आजीच्या मुलाला पण आई घरात होती तर घराला शिस्त होती असं वाटायचं. आल्या-



गेल्याव तिचं लक्ष असायचं. घरातली टापटीप, स्वच्छता ती पाहायची. निवडणं, दळणं करायची. आपण कामावरून घरी आल्यावर असं प्रेमानं, मायेनं पाहायची की सगळा शीण जायचा. ते काही नाही, सगळ्यांनी ठरवले, आजीला घरी आणायची. तिच्या देवाला आपला देव मानायचा.

अचानक आजी दारात उभी पाहताच सगळं घर आनंदानं तिच्या स्वागताला जमलं. नातवंडं तोंडभर हसली. बिलगली. सुनेनं नमस्कार केला. मुलगा हसून म्हणाला, ''ये आई ये.''

चिमाआजीला आपली विठू-रखुमाई भेटली. आपलं पंढरपूर गवसलं. आजी तोंडभर हसली. तिचा देव पण हसला.

***




सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसनाचे पैलू जाणून घेण्यासाठी वाचा 'व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत' ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.

**करून तर पाहा :**

# १) भिंतीवर सूर्य प्रकाशाचे रंग पाहणे

**चि. विठ्ठल जाधव, वाघमारे प्रशाला, औरंगाबाद**

हा प्रयोग भर दुपारी करून पाहावा. ट्रे किंवा ताट पाण्याने काठोकाठ भरून ते भिंतीशेजारी प्रखर उन्हात ठेवावे. भिंतीच्या विरुद्ध दिशेला त्या ट्रेमध्ये एक लहानसा आरसा त्याचा एक कोपरा दोन बोटात धरून हळूच कलता ठेवा. (गरजेप्रमाणे त्याचा कोन कमीजास्त करावा.) विशिष्ट कोनात आरसा आला की भिंतीवर निरनिराळ्या रंगाचे पट्टे दिसू लागतील. असे का होते? विशिष्ट कोनाचा काय संदर्भ आहे?




# २) आपोआप आग निर्माण होते

**श्री. विघ्नेश साने**

साहित्य - पोटॅशिअम परमँगनेटचे चिमूटभर खडे, अर्धा चमचा ग्लिसरीन, थोडासा कापूस, एक बशी.

कृती - एका बशीत पोटॅशिअम परमँगनेटचे चिमूटभर खडे ठेवावेत, त्याच्याजवळच सावधपणे ग्लिसरीनचे काही थेंब सांडून ठेवावेत. (ग्लिसरीन हे रंगहीन द्रावण आहे, त्यामुळे पटकन डोळ्याला दिसत नाही.) वर एक स्वच्छ कापूस ठेवावा. बशीतल्या पोटॅशिअम परमँगनेटचे खडे ग्लिसरीनमध्ये ढकलावेत थोड्याच वेळात चटचट आवाजाबरोबर धूर निर्माण होईल व बशीतला कापूस पेट घेईल.

**(सूचना –** प्रयोग झाल्यावरच प्रयोगातील बशी त्वरित धुवावी, म्हणजे डाग पडणार नाही. हा प्रयोग जादू म्हणूनही वापरता येईल.)





**२५०/- देणगी देऊन वाढदिवसानिमित्त आपल्या नावाने छात्र प्रबोधन मधील एक पान प्रायोजित करा.**

# गणित कूटप्रश्न-उत्तरे

१) डॉमिनो एक पांढरा आणि एक काळा वर्ग व्यापतो. म्हणून त्याने व्यापलेल्या क्षेत्रात पांढरे आणि काळे वर्ग सारख्या संख्येने पाहिजेत. बुद्धिबळ पटाचे दोन कोपरे छाटल्यावर त्यात 30 आणि 32 संख्येने काळे-पांढरे वर्ग उरतात. म्हणून डॉमिनोने हा पट व्यापता येणार नाही.

२) 36 चे तीन गुणक वेगवेगळ्या तऱ्हेने पाडून पाहा. उदा. $36 = 3 \times 3 \times 4$, $36 = 2 \times 3 \times 6$ इत्यादी. त्यात केवळ दोन प्रकार असे आहेत जिथे गुणांकाची बेरीज तीच भरते : $36 = 6 \times 6 \times 1 = 2 \times 2 \times 9$. त्यामुळे शेजारचा घर नंबर 13 असेल तर विक्रेत्याला प्रश्न पडेल की ह्या दोन्हीपैकी कुठले उत्तर बरोबर. (जर घर नंबर 11 असता तर त्याने लगेच 2, 3, 6 हे उत्तर सांगितले असते.) ज्याअर्थी 'सर्वात मोठी' मुलगी घरात आहे त्या अर्थी तिचे वय 9 असणार आणि 2, 2, 9 हे उत्तर बरोबर ठरणार.


३) समजा वेळापत्रकाप्रमाणे पुण्याच्या बस नंतर 6 मिनिटांनी मुंबईची बस येते. प्राची जर त्या 6 मिनिटात स्टॉपवर आली तर तिला मुंबईची बस मिळेल. जर ती उरलेल्या 54 मिनिटात आली तर तिला पुण्याची बस मिळणार. ती तासात केव्हाही येत असल्याने ह्या दोन्ही बसेस मिळण्याचे प्रमाण 6 : 54 म्हणजे 1 : 9 असणार.

४) समजा वीसाऐवजी एकच व्रात्य मुलगा असता. आधी त्याच्या पालकांना त्याबद्दल माहिती नव्हती. आणि तो वगळता इतर कुठलीही व्रात्य मुलगा नसल्याने त्यांची कल्पना होती की शाळेत व्रात्य मुले नाहीत. पण शाळेचे पत्र आल्यावर त्यांनी तर्क केला की आपलाच पाल्य व्रात्य असणार. म्हणून लगेच (म्हणजे पहिल्या दिवशी) त्यांनी कार्यवाही केली असती.

आता समजा दोनच व्रात्य मुले आहेत. त्यांच्या पालकांना माहिती आहे फक्त एकाच व्रात्य मुलाची. म्हणून वरील युक्तिवाद करून प्रत्येक जण एक दिवस वाट पाहील. तो दिवस उलटल्यावर दोघे पालक हा विचार करतील, ''ज्या अर्थी त्या दुसऱ्या पालकांनी आपल्या पाल्याला शिक्षा केली नाही त्या अर्थी एकाऐवजी दोन व्रात्य मुले आहेत आणि तो दुसरा-माहीत नसलेला-पाल्य माझाच असणार.'' म्हणून दोन दिवसांनी दोन्ही मुलांना शिक्षा होईल.

हाच युक्तिवाद २० मुलांना त्याच क्रमाने लागू होतो. विचार करून पाहा.

५) समजा A ह्या शहराकडे B आणि C शहरांकडून विमाने येतात. याचा अर्थ A हे शहर B पासून सर्वात जवळचे, तसेच C पासून सर्वात जवळचे. म्हणजे ABC त्रिकोणात BC ची लांबी AB आणि AC पेक्षा जास्त. तेव्हा BAC हा सर्वात मोठा कोन, म्हणजे ABC ह्या त्रिकोणातल्या तीन कोनांपैकी BAC हा कोन $60^0$ हून जास्त. म्हणजे ज्या ज्या शहरांपासून A कडे विमाने येतात त्यांच्या दिशांमधील कोन $60^0$ हून जास्त असणार. तेव्हा फक्त (जास्तीत जास्त) पाचच दिशा $360^0$ मध्ये बसवता येतात.




 *घरात ज्याच्या नाही पणती, अन्नावाचून मुले उपाशी, तोवर जारी असे लढाई, शत्रू असला जरी स्वदेशी.*

**विविध रोगांवर गुणकारी 'प्रबोधन सूक्ष्मौषधे' वापरा. संपर्क 'आयुर्वेद संशोधिका' ज्ञान प्रबोधिनी, पुणे.**

# अभ्यासातील स्वावलंबन - आकृत्यांचे रेखाटन व वाचन


**प्रा. विवेक पोंक्षे**

तुमचे कोणतेही पुस्तक उघडा आणि तुमच्या लक्षात येईल, तुमच्या पुस्तकात अनेक चित्रे आणि आकृत्या छापलेल्या असतात. चित्रे आणि आकृत्यांचा उपयोग पुस्तकातला मजकूर चांगला समजण्यासाठी होत असतो. त्यामुळे परीक्षेतसुद्धा आकृत्या काढण्याचे किंवा आकृत्यांचे निरीक्षण करून त्यांच्याखाली लिहिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा, असे प्रश्न विचारलेले असतात.


आकृत्या काढून किंवा वाचून आपल्याला विषयाची स्पष्टता येते. तसेच त्या विषयातला तपशील लक्षात ठेवण्यासाठीही आकृत्यांचा उपयोग होतो. शास्त्र व भूगोल या विषयांमध्ये तर अनेक गोष्टींची रचना समजावून घेण्यासाठी आकृत्यांचा उपयोग होतो. पृथ्वीचा अक्ष २३.५° कललेला आहे. हे वाक्य स्पष्ट होण्यासाठी पृथ्वीच्या अक्षाची स्थिती डोळ्यासमोर यावी लागते. त्यासाठी आकृतीची गरज आहे. अपवर्तन होताना प्रकाशकिरणांचा मार्ग नेमका कसा असेल याची कल्पना किरणाकृतीवरून येऊ शकते. आकृतीचा आणखी एक उपयोग म्हणजे खूप माहिती थोडक्यात सांगणे असा आहे. समजा जीवशास्त्रात आपण एखाद्या विशिष्ट वनस्पतीच्या जीवनक्रमाचा (Life Cycle) अभ्यास करतो आहोत. जीवनचक्राची संपूर्ण पानभर माहिती लिहूनही वर्णन करता येईल किंवा एक आकृती काढूनही करता येईल. पण आकृतीने तीच माहिती अधिक स्पष्ट व तरीही थोडक्यात देता येईल.

आकृत्यांचे अनेक प्रकार पाडता येतात.

१) रेखाचित्रे (sketches) २) रेखाकृती



उंटाचा काफिला • रेखा चित्र




रेखाकृती - स्पायरोगायरा


३) किरणाकृती ४) त्रिमित आकृती

**१) रेखाचित्रे –** यामध्ये एखाद्या गोष्टीचे चित्र रेखाटलेले असते. चित्र कलात्मक नसले तरी चालते. चित्र अगदी हुबेहूब नसले तरी चालते. मात्र ते प्रमाणबद्ध व महत्त्वाचे सर्व तपशील दाखवणारे असावे लागते. उदा. भूगोलात एस्किमोंचे बर्फातील घर किंवा जीवशास्त्रात निरनिराळ्या जातीचे पक्षी.

**२) रेखाकृती –** यात प्रयोग रचना, प्राणी–वनस्पती यांचे भाग, ग्रहणे, पर्वत, पठारे इ. भूरूपरचना यांसारख्या तपशीलांचे रेखाटन करावे लागते. यासाठी मूळ वस्तू जरी त्रिमित (3-dimensional) असली तरी तिची आकृती द्विमित (2 dimensional) असली तरी चालते. या आकृतीप्रकारात त्या वस्तूचे सर्व भाग दाखवून त्यांना नावे देणे आवश्यक असते. आकृतीतील सर्व भाग परस्परांशी प्रमाणबद्ध असावे लागतात. रचनेतील, तपशीलातील बारीकसारीक तपशीलही आकृतीत दाखवावे लागतात. उदा. ऑक्सिजन तयार करण्याच्या प्रयोगाची आकृती काढताना वायूचे बुडबुडे, भूगोलात खारे वारे, मतलई वारे दाखवताना दिवसरात्र, जीवशास्त्रात स्पायरोगायराची पेशी काढताना त्यातील हरितलवकातील प्रकणू, इ.

**३) किरणाकृती –** मुख्यत: 'प्रकाश' या विषयावरच्या अनेक आकृत्या किरणाकृती या प्रकारात मोडतात. या आकृत्यांमध्ये प्रकाशकिरणांचा मार्ग, पदार्थ व प्रतिमा किरणांनी दाखवलेला असतो. किरणाकृतीत प्रकाशकिरणांची दिशा, पदार्थ, प्रतिमा यांची स्थाने व अंतरे यांचे योग्य भान असावे लागते. भिंग, आरसे यांच्या त्रिज्या व प्रिझम, काचेची पट्टी यांची लांबी–रुंदी निश्चित असावी लागते. म्हणजे मग आकृतीतील एखादा भाग कागदाच्या बाहेर जात नाही. किरणाकृती काढताना ती अचूक असणे महत्त्वाचे आहे.


**४) त्रिमित आकृत्या –**भूमितीसारख्या विषयात आपल्याला शंकू, वृत्तचिती, घन, इष्टिकाचिती, वितलीय रेषा, प्रतले व रेषा इ. त्रिमित आकृत्या काढाव्या लागतात. शास्त्र विषयातही कधीकधी काही उपकरणांच्या त्रिमित आकृत्या काढाव्या लागतात. उदा. सूक्ष्मदर्शक यंत्र, फॉर्टिनचा हवादाबमापी, इ. या आकृत्या त्रिमित असूनही तुम्हाला




**किरणाकृती**

कागदावर (म्हणजेच द्विमितीत) काढाव्या लागतात. यासाठी त्यांचे काही भाग मुद्दाम वेगळ्या पद्धतीने काढून त्यांच्यात त्रिमित आकाराचा आभास निर्माण करावा लागतो. उदा. खालील आकृतीत m S EHG व m S HGF हे प्रत्यक्षात सारखे असतात व प्रत्येक कोन $90^0$ मापाचा असतो. मात्र आकृतीत त्रिमितीचा आभास निर्माण करण्यासाठी m S EHG > $90^0$ m S HGE $90^0$ दाखवले आहेत किंवा खालील आकृतीतील शंकूचा पाया प्रत्यक्षात वर्तुळाकृती आहे. मात्र त्रिमितीचा आभास निर्माण करण्यासाठी येथे तो लंबवर्तुळाकार काढला आहे.

आकृत्या काढण्याचा सराव करण्यासाठी बसताना, खाली दिलेले साहित्य तुमच्या जवळ तयार असले पाहिजे.




**त्रिमित आकृत्या**

१. दोन टोकदार पेन्सिली त्यातील एक 1H व दुसरी HB.

२. सर्व साहित्यानिशी सुसज्ज अशी कंपासपेटी, यातील कंपासचे टोक बोथट नको. कंपासच्या दोन भागांना जोडणारा स्क्रू पुरेसा घट्ट असावा म्हणजे वर्तुळ काढताना कंपास हालणार नाही.

३. 30 सें.मी. लांबीची पट्टी.

४. प्रोसर्कल्स, अथवा 25 पैसे, 50 पैसे व 1 रुपयाची नाणी.

५. रंगीत पेन्सिली.

६. उत्तम खोडरबर

* आकृती काढण्यापूर्वी पुस्तकातल्या आकृतीचे बारकाईने निरीक्षण करा. आकृतीचे आकारमान त्यातील विविध भाग यांची मनात नोंद करा. तुम्ही ज्या जागेत आकृती काढणार आहात त्या जागेच्या आकारमानाचा अंदाज घेऊन तुमच्या आकृतीची मापे निश्चित करा.

* आकृती काढताना ती कागदाच्या मध्यभागी येईल याची काळजी घ्या.

* आकृतीची वैशिष्ट्यपूर्ण व ठळक भागात विभागणी करा. नंतर प्रत्येक भाग क्रमश: काढत संपूर्ण आकृती पूर्ण करा.

* सुरुवातीला आकृती पुसट काढा. नंतर त्यातील महत्त्वाचे भाग सुस्पष्ट करा.

* आकृतीतील विशेष भाग रंगीत पेन्सिलींनी किंवा काळ्या रंगाच्या शेडींगने इतर भागांपासून वेगळे दिसतील असे पाहा.

* आकृती पूर्ण झाल्यावर त्यातील भागांना नावे द्या. नावे देताना आकृतीच्या


**१०० दिवसांच्या शाळेमध्ये शिकवायला जायचं का? संपर्क साधा - प्रचीती, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.**

एकाच भागात खूप नावांची दाटी होणार नाही याची काळजी घ्या.

* आकृतीला चौकट करा.

* आकृतीत आवश्यक असतील ती मापे लिहा.

विशेषत: भूमितीतील रचना व प्रकाशशास्त्रातील किरणाकृतीत ते आवश्यक असते. आकृत्या काढताना अनेकदा प्रथम कच्च्या आकृत्या काढण्याचा सराव करावा. यातून संपूर्ण आकृतीचा आवाका येतो व आकृतीतील अवघड भाग कोणते याची कल्पना येते.

काहीवेळा पुस्तकातील एखाद्या भागावर आधारित आकृती पुस्तकात दिलेली नसते. असा मजकूर वाचून त्यावर आधारित एखादी आकृती आपण काढू शकतो का? असाही प्रयत्न करून पाहावा.

आकृत्या काढण्याइतकेच आकृत्यांचे वाचन करता येणे महत्त्वाचे असते. आकृती वाचायची म्हणजे त्या आकृतीचे निरीक्षण करून त्या आकृतीवर जे प्रश्न विचारलेले असतील त्यांची उत्तरे देणे. यासाठी आकृतीतील सर्व भाग ओळखता यावे लागतात. नंतर या भागांमध्ये काही संबंध असतील तर ते लक्षात घ्यावे लागतात. आकृतीतील वैशिष्टचे शोधता आली पाहिजेत. आकृतीच्या संदर्भात असणारा पुस्तकातील तपशील आठवला पाहिजे. आकृतीवरून काही निष्कर्ष काढता आले पाहिजेत. हे सर्व करता आले म्हणजे आकृती वाचता आली. यासाठी अनेक आकृत्या वारंवार पाहिल्या पाहिजेत.

आकृत्यांचा अभ्यास करण्यासाठी पुढील गोष्टी तुम्ही करून पाहा.

१. संपूर्ण आकृती कच्च्या स्वरूपात भरभर काढणे.

२. संपूर्ण आकृती जशीच्या तशी अनेकदा काढून पाहणे.

३. आकृतीतील काही भागच (विशेषत: अवघड) पुन्हा पुन्हा काढून पाहणे.

४. एखादी आकृती काढा. पण तिच्या भागांना नावे देऊ नका. त्या आकृतीतील भागांना नावे देण्याचा सराव करा. नावे देताना पेन्सिलने द्या व नंतर खोडून टाका.

५. एखादी चुकीची आकृती काढून ती दुरुस्त करा. विशेषत: मित्रांच्या बरोबर असा सराव तुम्ही सहज करू शकाल.

६. आकृतीतील न काढलेले भाग काढून आकृती पूर्ण करा.

७. आकृतीतील चुका ओळखा.

८. आकृती पाहून त्यावर स्वत:च अनेक प्रश्न तयार करा व त्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

९. आकृती पाहून तिचे एक पानभर वर्णन लिहून काढा.

१०. एखाद्या विशिष्ट पाठातील जास्तीतजास्त मजकूर आकृत्यांच्या मदतीने लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा.

या साऱ्या सरावातून तुमचे आकृती रेखाटनाचे व वाचनाचे कौशल्य नक्कीच विकसित होईल.



**अभ्यासाची विविध तंत्रे समजून घेण्यासाठी वाचा 'वेध यशाचा' छात्र प्रबोधन प्रकाशन.**

# एक स्वयंभू व्यक्तिमत्त्व-'इंदिरा गणेश लगडकर'

शीला पत्की, सोलापूर

वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी वैधव्य प्राप्त झालेल्या इंदिराबाई गणेश लगडकर या स्वत:च्या पायावर स्वाभिमानाने जगून स्त्री सबला आहे हे त्या काळात दाखवून देणाऱ्या स्त्रियांपैकी एक.

आजकाल मुलांना शाळेत बालवाडीत घालायचं जे वय, त्याच वयात बाई विधवा झाली या शब्दांचंच मला आश्चर्य वाटे. विधवा होण्याइतपत ती 'बाई' होती का? सधवा असणं काय ते ठाऊक होतं का? खायच्या, खेळायच्या वयात त्या पोरीच्या नशीबी विधवेचा शिक्का मारला. आजीनं सांभाळ केला; संस्कार केले. आयुष्य या पोरीनं कसं काढावं म्हणून अध्यात्माची गोडी लावली. आजी खंबीरपणानं पाठीशी उभी राहीली. पण पुढचं आयुष्य कसं काढायचं?

पण नशीबानं मोठी गंमत केली. अमेरिकेतील एक सधन गृहस्थ जे वाङ्मयाचे चाहते होते त्यांना समर्थ रामदासांच्या चरित्रावरील २६ वा अध्याय हवा होता व तो त्यांना चाफळ–सज्जनगड इथे कोठेही उपलब्ध झाला नाही म्हणून त्यांच्यामार्फत पुणे सेवासदनच्या श्री. गोडबोले नामक शिक्षकांनी जाहिरात दिली व लगडकर बाईंच्या बंधूंनी – वि. ना. कोठीवाले यांनी ती जाहिरात वाचली व गोडबोल्यांना उपलब्धता कळवली. गोडबोले घरी आले. बाईंनी तो अध्याय आपल्या अस्खलित वाणीने वाचून दाखविला. एवढ्या छोट्या मुलीचे त्यांना कौतुक वाटले व सर्व परिस्थिती ऐकून त्यांनी बाईंच्या आई वडिलांना सांगितले की, ही माझी मुलगी समजून मी तिचे शिक्षण करतो व त्यांनी त्यांना प्रथम पुणे सेवासदन येथे आणले. व्हर्न्येक्युलर फायनल या परीक्षेला फॉर्म भरण्याची वेळ आली. तेव्हा त्यांनी बाबांना कै. देवधरांना सांगितले की माझे जन्मनाव इंदिरा आहे. आजीला मुलगा नाही म्हणून तिचे आडनाव लगडकर व विद्येचा देव गणेश म्हणून मी इंदिरा गणेश लगडकर या नावाने फॉर्म भरणार. ज्या नवऱ्याला मी पाहिलेले सुद्धा नाही त्याचे नाव मुळीच लावणार नाही. स्वत:च्या नावात सुद्धा स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या लगडकरबाई अत्यंत स्वाभिमानी होत्या.

सेवासदनात सर्व प्रकारची कामे करून त्यांनी शिक्षण घेतले. स्वयंपाक करणे, कामगारांची मुले सांभाळणे, सधन लोकांची मुले सांभाळणे, सोलापूरातील काही दवाखान्यातून दाईचे काम करणे अशी कामे करून त्या शिकल्या व सरस्वती मंदिराच्या प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून त्यांनी आपली सेवा रुजू केली. अनेक मुलींना स्वत:च्या पायावर उभं राहण्यासाठी मदत केली.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वाभिमानाने



**बुद्धिमत्ता चाचण्यांसाठी भेटा अथवा लिहा - प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.**

प्रत्येक गोष्टीत झगडत त्यांनी आयुष्य कंठले. अनेकांची सेवा केली. त्या काळातल्या सनातन समाजाला तोंड दिले. सासरच्या व माहेरच्या काही समरप्रसंगांमध्ये वयाने लहान असूनही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. अनेकांशी आपल्या सेवाभावी कृतीने नातं जोडलं. शेवटपर्यंत स्वावलंबी राहिल्या. वृद्धापकाळात एखादी काडेपेटी आणण्याचे काम सुद्धा त्या दुसऱ्यांना सांगत नसत. अखेरच्या दिवसापर्यंत त्या स्वत: कार्य करीत राहिल्या. सेवासदनबद्दल त्यांना अतिशय कृतज्ञता वाटे. सेवासदनचा उत्कर्ष हा त्यांचा आनंद असे. कार्य करणाऱ्या महिलांना त्या कर्वे, रानडे, कै. देवधर यांचा आदर्श घ्यायला सांगत.

एका संस्थेच्या मदतीने खडतर परिस्थितीत श्रमदानातून शिक्षण घेऊन अनेकांना दीपस्तंभासारखा मार्ग दाखवणाऱ्या लगडकर बाई कोणाचीही सेवा न घेता आकस्मिक हे जग सोडून गेल्या. नातं असणारे असंख्य डोळे पाझरले; मनं गहिवरली अन् एक ओळ आठवली.

**परि जयांच्या दहनभूमिवर**
**नाही चिरा नाही पणती**



**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट अधिनियम, ११ वी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)**

| | |
|---|---|
| वृत्तपत्राचे नाव | : छात्र प्रबोधन |
| प्रसिद्धी काळ | : मासिक |
| संपादकाचे नाव व पत्ता | : प्रा. महेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| प्रकाशकाचे नाव | : प्रा. महेन्द्र सेठिया |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| मुद्रकाचे नाव व पत्ता | : प्रबोध संपदा, १०७०, शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२. |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| मासिकाची मालकी | : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |

मी महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.
पुणे सौर फाल्गुन १, शके १९१७
(२० फेब्रुवारी १९९६) सही
महेन्द्र सेठिया
संपादक, छात्र प्रबोधन

## वार्षिक वर्गणीतील वाढ पुढे ढकलली...!

वर्ष ४ अंक ६ मध्ये जाहीर केल्याप्रमाणे छात्र प्रबोधनची वार्षिक वर्गणी सौर फाल्गुन १, शके १९१७, २० फेब्रुवारी १९९६ पासून रु. १००/- होणार होती. तथापि ही मुदत वाढवून १५ मार्च ९६ पर्यंत चालू वर्गणीतच (वार्षिक रु. ७५/-) मासिकाचे सभासद होता येईल. आपल्या शाळेतील अनेक मित्र-मैत्रिणींना व नातेवाईकांना या सवलतीची माहिती देऊन सभासद होण्यास सांगावे.

**१५ मार्च ९६ नंतर वर्गणी रु. १००/- होणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी अन् तत्पूर्वी सभासद वाढविण्याचे प्रयत्न करावेत.**



**आधुनिक काळात अर्थपूर्ण संस्कार होण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रकाशित पोथ्या वापरा.**

# वाचलेच पाहिजे असे काही
# 'नेगल'

**सौ. सुषमा निसळ**



नेहमीचे चाकोरीबद्ध जीवन जगण्यापेक्षा आगळे-वेगळे धाडसी जीवन आव्हानात्मक असते. त्यात अनेक धोके असतात, अनपेक्षित परिस्थितीला सामोरे जावे लागत असते. पण हे सर्व करीत असताना त्यातून एक निराळा आनंदही अनुभवायला मिळत असतो. त्या आनंदातून अधिक उत्साह मिळत असतो. प्रेरणा मिळत असते.

आपण आपल्या घरात आणि आजूबाजूला बरेच पाळीव प्राणी बघत असतो. कुत्रा, मांजर, पोपट, गायी, म्हशी, एवढीच त्याची ठरावीक व्याप्ती आपल्या पाहण्यात असते. पण आदिवासी भागात राहून एखाद्याने जंगली प्राणी पाळले आहेत असे आपल्याला सांगितले तर आपण विश्वास ठेवणार नाही. कारण जंगली प्राणी आपण फक्त प्राणी संग्रहालयातील पिंजऱ्यात किंवा सर्कशीतच बघत असतो. अशा प्राण्यांपासून चार हात लांब राहणेच आपण पसंत करीत असतो. पण वाघ, अस्वल, रानकुत्रा, माकड यासारखे जंगली प्राणी एकत्र सांभाळण्याचा धाडसी प्रयत्न केला आहे. डॉ. प्रकाश आमटे यांनी. 'हेमलकसा' या आदिवासी भागात त्यांनी हा प्रकल्प चालविलेला आहे. हा भाग चंद्रपूर जिल्ह्यात येतो.

'नेगल' हे पुस्तक संपूर्णपणे याच प्रकल्पाची ओळख आपल्याला करून देते. बिबळ्या वाघाला आदिवासी लोक 'नेगल' म्हणतात. म्हणून हेच नाव पुस्तकाला दिलेले आहे. डॉ. प्रकाश आमटे यांचे या प्रकल्पावरील सहकारी श्री. विलास मनोहर यांनी या पुस्तकाचे लेखन केलेले आहे.

सध्या सगळीकडेच होत असणारी बेसुमार जंगलतोड, अनिर्बंध शिकार यामुळे जंगलातील प्राणी दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालले आहेत. प्राणी संग्रहालयातही त्यांची नीट निगा राखली जात नाही. अशा परिस्थितीत पुढच्या पिढीला या प्राण्यांची फक्त छायाचित्रेच बघायला मिळतील. असे होऊ नये म्हणून डॉ. प्रकाश यांनी हा प्रकल्प उभारला आहे. अतिशय तळमळीने, जीव लावून तसेच प्रसंगी जीव धोक्यात घालूनही या प्राण्यांचे संगोपन , संवर्धन ते करीत आहेत. हे काम करीत असताना त्यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सरकारचे, वनखात्याचे विचित्र, त्रासदायक नियम त्यांच्या कामाच्या आड येत आहेत. कोणत्याही स्वरूपाची आर्थिक मदत मिळत नाही आणि तरीही मोठ्या जिद्दीने ते हा प्रकल्प सांभाळत



**ललित लेखनाची कृतिपुस्तिका 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' आवर्जून संग्रही ठेवा-ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.**

आहेत. ‘नेगल’ मध्ये या साऱ्याचा उल्लेख आलेला आहे.


डॉ. प्रकाश आमटे यांनी हे सर्व प्राणी त्यांच्या बाल्यावस्थेपासून सांभाळले आहेत. या पिल्लांचे डोळेही उघडलेले नसताना, त्यांना निपलने दूध पाजले आहे. बालपणातील त्यांचे आजार औषधोपचाराने बरे केले आहेत. त्यांना समज आल्यानंतर त्यांचे रुसवेफुगवे काढले आहेत, निरनिराळे हट्ट पूर्ण केले आहेत. ‘जंगली’ म्हणवले जाणारे हे प्राणी त्यांनी कष्टाने, प्रेमाने ‘माणसाळावले’ आहेत.

काही काही प्रसंग विलक्षण चटका लावणारे आहेत. वाघांच्या पिल्लांची वाढ योग्य रीतीने होण्यासाठी त्याला मांस देणे क्रमप्राप्तच असते. जंगलात आयत्यावेळी असे मांस मिळत नसे. त्यावर उपाय म्हणून मेलेले प्राणी सापडतील तेव्हा त्यांचे मांस काढून तुकडे करून फ्रीजमध्ये भरून ठेवण्याचे काम या मंडळींनी केले आहे. जंगलामध्ये वीज उपलब्ध नाही. त्यांच्याकडे रॉकेलवर चालणारा फ्रीज आहे.

या पुस्तकाचे मुख्य आकर्षण म्हणजे त्यातील देखणी छायाचित्रे! जंगली प्राण्यांचे माणसांबरोबरचे सहज वावरणे या छायाचित्रात बघायला मिळते. पहिल्याच पानावरचे नेगलचे चित्र पुस्तक वाचनाची उत्सुकता कायम ठेवते.

श्री. विलास मनोहर यांनी त्यांना आलेले अनुभव मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. वन्य प्राणी सांभाळताना, वाढविताना येणाऱ्या अडचणी आपल्यासमोर मांडल्या आहेत.

वन्य प्राण्यांबद्दलचे कुतूहल अन् औत्सुक्य जागविणारे अन् वाढविणारे हे पुस्तक विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचायला हवे.






***To be Masters in Computers, Contact, I.M.L.D. Jnana Prabodhini, Pune.***

# देखणे ते डोळुले

**डॉ. कौमुदी गोडबोले**



डोळे म्हणजे 'मनाचा आरसा' असं म्हणतात. डोळ्यांची वर्णनं करताना लेखणी मुळी थकतच नाही. तेजस्वी, पाणीदार डोळे, बावरे डोळे, भेदक डोळे, निरांजनासारखे तेवणारे डोळे, तांबारलेले डोळे-एक ना दोन ! कमलाक्षी, मीनाक्षी, नयना, नीलाक्षी अशा नावांतून भेटणारे डोळे - परिसराशी नातं टिकवणाऱ्या पंचेंद्रियांमधले अग्रणी !

आजूबाजूचं जे जे मनात ठसतं, ते सारं आपल्या मनात साठतं कायमचं ! कॅमेऱ्यातून फोटो निघावा तसं ! कॅमेऱ्यासारखी डोळ्यातही लेन्स असते. प्रकाशाची झडप म्हणजे डोळ्याची बाहुली आणि फिल्मचं काम नेत्रपटल करतं. अर्थात आपला डोळा कॅमेऱ्याच्या वरताण आहे बरं ! कॅमेऱ्यातल्या फोटोत आपल्याला द्विमीती आकृती दिसते. पण ह्या डोळयांच्या कॅमेऱ्यातून आपण त्रिमिती दृश्य बघतो. लांबी ह्व रूंदी ह्व खोली ! म्हणून तर वेगवेगळ्या वस्तूंमधली अंतरं, त्यांचे विशिष्ट कोन, रचना आपल्याला सहज समजतात. दोन माणसांचं जास्तकाळ एकमेकांशी पटणं अवघडच. पण हे दोन डोळे मात्र कायमच एकमेकांशी जुळवून घेतात. दोघं जरी एका वस्तूची प्रत्येकी एक-एक प्रतिमा पाहात असले तरी मेंदूच्या साहाय्याने आपल्याला मात्र एकच वस्तू दिसते. कधीकधी मात्र त्यांच्यात दुरावा निर्माण होतो आणि मग चकणेपणा येतो !

डोळ्याची लेन्स पाहिजे तशी आकुंचन-प्रसरण पावते आणि जवळचं-लांबचं पाहायला मदत करते. दूर क्षितिजावर खिळलेली नजर जेव्हा अचानक नजीकच्या नाकाच्या शेंड्याकडे वळते, तेव्हा दोन्ही बुबुळं पटकन जवळ येतात, खाली वळतात आणि दूरचं-जवळचं तितक्याच स्पष्टपणे आपण बघू शकतो. वयानुसार लेन्सचा लवचीकपणा कमी होतो, डोळे थकायला लागतात. आपण म्हणतो - 'चाळिशी लागली'! कधीकधी ही लेन्स अपारदर्शक बनते आणि मोतीबिंदू होतो. लेन्सच्या आकारमानातील दोषांमुळे काहींना लांबचं दिसत नाही तर काहींना जवळचं ! मग चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्सेसच्या मदतीने हा दोष सुधारावा लागतो. काहीवेळा तर शस्त्रक्रियादेखील करावी लागते !

डोळ्यांना दिलेली आरशाची उपमा साहित्यातच नाही, तर प्रत्यक्षातही खरी आहे. वेगवेगळ्या आजारांचं निदान करायला डोळेच तर मदत करतात

डॉक्टरांना! ! काविळीचे पिवळे डोळे, रक्त कमी असलं की पांढुरके डोळे, 'अ' जीवनसत्त्वाची कमतरता असली तर मातकट, करडे ठिपके असलेले डोळे ! एवढंच नाही, तर डोळ्यांच्या बाहुल्यांच्या आकारांवरून, डोळ्यांत आत डोकवून तपासणी करून किंवा बुबुळांच्या हालचालींवरून थेट मेंदूचा कानोसा घेता येतो.

या रंगीबेरंगी दुनियेतल्या अगणित छटा आपल्याला मोहवतात. पण काही दुर्दैवी लोकांना मात्र लाल आणि हिरवा असे रंगच मुळी कळत नाहीत–त्यांना सगळं करडं–राखाडीच दिसतं. म्हणून वाहन चालवण्यासाठी–जिथे लाल–हिरव्या दिव्यांच्या इशाऱ्यावरच चालावं लागतं–तेव्हा रंगांधळेपणा नसल्याची खात्री करावी लागते. तशी रंगीत दृश्य दिसण्याची यंत्रणा जन्मत:च असते पण रंगांचा अर्थ मात्र हळूहळू समजायला लागतो. चार पाच महिन्यांचं बाळ 'तुला लाल लाल चेंडू हवा, की निळा निळा?' असं विचारल्यावर नुसतंच हसतं ते यासाठीच ! अर्थात डोळ्यांनी जे दिसतं ते समजण्यासाठी कार्यक्षम मेंदूची गरज असते. त्यामुळे काही वेळा डोळा पूर्णत: चांगला असूनही अपुऱ्या वाढलेल्या किंवा बिघडलेल्या मेंदूमुळे 'बघणं' शक्य नसतं. निरोगी डोळे आणि त्यातून उमटणारी चित्रलिपी वाचणारा मेंदू ही एक अमूल्य देणगी आहे आपल्याला !

म्हणून मंडळी नंतर डोळ्यावर उपचार करण्यापेक्षा आधीच थोडी काळजी घेतलेली बरी ! Prevention is better than cure! तर सुरुवात करायची पोटोबापासून – म्हणजे 'अ' जीवनसत्त्व असलेले पदार्थ आपल्या आहारात जरूर घ्यायचे – गाजर, लाल भोपळा, पपई, अळू, शेवगा, हिरव्या पालेभाज्या, अंडी, उन्हाळ्यात आंबे यापैकी काहीतरी एक रोज पोटात जाईल हे बघायचं ! आपला अभ्यास पुरेशा प्रकाशात करायचा. उताणं लोळत नाही तर पुस्तक व्यवस्थित अंतरावर धरून शक्यतो डावीकडून प्रकाश येऊ द्यायचा. रात्री झोपण्यापूर्वी डोळे स्वच्छ पाण्याने धुवायचे आणि आमच्या मैत्रिणींसाठी एक सूचना बाजारी काजळ, सुरमा शक्यतो वापरायचं नाही. घरगुती काजळ असेल तरी स्वत:ची डबी पाहिजे आणि हो कितीही गोजिरवाणं बाळ असलं तरी त्याच्या डोळ्यात मात्र काजळ नाही घालायचं. कपाळावर, गालावर कुठेही लावायचं ते हवं तर !

फटाके उडवताना, रामायणातल्यासारखं धनुष्यबाणांनी खेळताना किंवा जोरात विट्टी उडवताना कोणाच्या डोळ्याला इजा तर होत नाही नं ते बघायचं. घरी तळण करताना, शाळेत प्रयोग करताना वाफा, रसायनं यापासून जपायचं !

थोडक्यात, उत्तम आहार, उत्तम प्रकाश आणि डोळ्यांची नियमित निगा राखली तर नजरेचा नजराणा नक्कीच आपला होईल !



**काय वाचावे? हे समजण्यासाठी जरूर वाचा 'वाचलेच पाहिजे असे काही' छात्र प्रबोधन प्रकाशन.**

# ‘आम्ही उसळत्या लाटा’

**डॉ. नलिनी गुजराथी**




मलपृष्ठावर छापलेल्या ‘आम्ही उसळत्या लाटा’ या डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या पद्यातून तेजस्वी, झुंजार, सात्त्विक, प्रसन्न अशा युवतींची प्रतिमाचित्रे साकारलेली आहेत. ‘प्रतिमाचित्रे’ हा शब्दच इथे यथार्थ वाटतोय; कारण प्रत्येक ओळीत एखादी प्रतिमा अभिव्यक्त होते. ही प्रतिमा कमालीची चित्ररूप आहे. त्या प्रतिमेतून संबंधित प्रसंगाचे चित्रच आपल्या डोळ्यापुढे उभे राहते. सर्वसाधारणपणे काव्यातून व्यक्त होणारे तरुणीचे चित्र हे तिच्या सौंदर्याविषयी असते तर या पद्यात मात्र युवतींकडे असायला हव्या असणाऱ्या गुणसंपदेचे चित्रदर्शन आपणास घडते. किंबहुना स्वत:मध्ये असणाऱ्या सामर्थ्याची, स्त्री-शक्तीची जाणीव युवतींना करून द्यावी, त्यांचे स्वत्व जागृत करावे हाच या पद्याचा हेतू आहे.

तारुण्य हे उत्साहाने, जोमाने भरलेलं असतं. या सळसळणाऱ्या उत्साहाला ‘उसळत्या लाटा’चं रूपक चपखल वाटतं. या युवती म्हणजे साचलेल्या पाण्याचा तलाव किंवा नदीचा संथ प्रवाह नाहीत तर चैतन्य सागराच्या झेपावणाऱ्या लाटा आहेत. त्यांच्यात जिवंतपणा आहे. शिव आणि शक्ती या दोन तत्त्वांनी युक्त अशा परमेश्वरी चैतन्याचाच त्या अंश आहेत.

या युवती गीतामधून म्हणताहेत,

‘‘आम्ही तर जमिनीला भेदून वर येणाऱ्या

अंकुराप्रमाणे आहोत. आकांक्षांची पालवी आम्हाला फुटलेली आहे. आमच्या या 'आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणे.' झाले आहे. आम्ही दाही दिशांना गगनभरारी घेणारे गरुड आहोत. आमच्या पोलादी पंखांना थकणे माहीत नाही. गरुडाने जसा अमृतकलश स्वर्गातून पृथ्वीवर विनीतेला आणून दिला तसे ईप्सित ध्येय कितीही असाध्य असेना ते पार पाडल्याशिवाय आम्ही थांबणार नाही.



आम्ही दिसायला जरी कोमल फुलांसारख्या नाजूक असलो तरी आमचे आंतररूप मात्र तेजस्वी, प्रखर ज्वालेसारखे आहे. आमच्या हाती दुर्गेच्या हातातील खड्ग आहे. ते धारदार आहे. हे खड्ग कधी उगारायचे याचा विवेक आम्हाला आहे. जिथे कुठे दुष्ट शक्तींचे, आसुरी शक्तींचे तांडव चालले आहे तिथे त्या असुरांच्या मस्तकी पाय देऊन त्यांचा नि:पात करण्याचे सामर्थ्य आमच्या ठायी आहे.

आम्ही नुकत्याच उमललेल्या फुलासारख्या टवटवीत प्रसन्न आहोत. पण आम्ही नुसत्याच नाजूक, कोमल नाही तर सूर्याच्या तेजस्वी किरणकळ्या आहोत. आमच्या मातृभूमीसाठी आमच्या प्राणांचे बलिदान करून आमच्या प्राणज्योतींनी तिची पूजा संपन्न करू अशी आमची आकांक्षा आहे.''

गीताचा हा थोडक्यात आशय ! तो काहीशा वेगळ्या लयीच्या पद्यातून व्यक्त होतो. हे गीत वाचत असताना ग.दि. माडगूळकरांच्या 'पिढ्यानपिढ्यांच्या निर्भय आम्ही भारतीय भगिनी' या पद्याची आठवण झाल्यावाचून राहत नाही. या गीतातून साकारते दुर्गेसारखी इंग्रजांवर तुटून पडलेली झाशीची राणी, स्वराज्याचे ईप्सित शिवरायांकरवी साध्य करण्यासाठी निघालेली पोलादी मनाची जिजाबाई, तेजस्वी तरीही संयत अशी इतरांसाठी झिजणारी अहिल्याबाई, अग्नीला समर्पित होणारी तेजाची किरणकळी राणी पद्‌मिनी ! अशी असंख्य स्त्रीरत्ने आपल्याला स्मरतील. पुराणकाळातील सीतासावित्री पासून ते आधुनिक काळातील इंदिराजी, किरण बेदी यासारख्या कर्तृत्ववान स्त्रियांपर्यंत अनेक जणींचे चित्र या प्रतिमांमधून आढळेल. आजच्या काळातील युवतींना आपली चित्रप्रतिमा या गीतातून सापडावी यासाठी या गीतातील आशय त्यांच्या कृतीतून उतरला पाहिजे. त्यासाठी तो आधी कंठातून हृदयात गेला पाहिजे. यासाठी हे पद्य पुन: पुन: म्हणायचं, मनात घोळवायचं !



**कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी 'कल्पक बनू या' अवश्य वाचा-ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.**

# एप्रिल - मे - जून मधील विविध शिबिरे

## नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे

**मुलींसाठी :** २६ एप्रिल ते १ मे १९९६ **मुलांसाठी :** २५ मे ते ३० मे ९६
**वयोगट :** इ. ८ वी व वरील विद्यार्थी **शिबिरस्थान :** पुणे परिसर
**शिबिरशुल्क :** रु. ३००/- (शिबिरकाळातील निवास-प्रवास-भोजन इ. सह)

शिबिर पूर्ण वेळ निवासी असून शिबिरामध्ये नेतृत्वगुणांच्या विकासासाठी विविधांगी कृतिपर उपक्रम घेतले जातील. या शिबिरात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे ८ दिवस व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे घेण्यासाठी अन्यत्र पाठविले जाईल. त्यासाठी होणारा प्रवास-निवास-भोजनखर्च छात्र प्रबोधन द्वारा केला जाईल.

हे शिबिर सर्वसामान्य ज्ञान-मनोरंजनाचे व्यक्तिविकास शिबिर नाही. नेतृत्वाची आवड असलेल्या, नवीन गोष्टी शिकू इच्छिणाऱ्या अन् कष्टाची तयारी असलेल्या मुलामुलींनी या शिबिरात सहभागी व्हावे.

**स्वत:मधील नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी दवडू नका.**

## संयोजक प्रशिक्षण शिबिर

गेल्या तीन महिन्यांमध्ये महाराष्ट्रात १२ ठिकाणी पालकांचे मेळावे झाले. विद्यार्थ्यांना अभ्यासातील गुणांपलीकडे व्यवहारज्ञान, आत्मविश्वास, सर्वांगीण विकासाची दिशा व प्रेरणा मिळावी यासाठी शाळेबाहेर विविध कार्यक्रम व्हायला हवेत अशी तीव्र अपेक्षा बहुसंख्य पालकांनी व्यक्त केली. ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीत या सर्वच गोष्टींना विशेष महत्त्व असून गेली २५-३० वर्षे यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम ज्ञान प्रबोधिनीमध्ये होत आहेत. ठिकठिकाणी हे उपक्रम पोहोचविण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीचे प्रयत्न चालू आहेतच. तथापि उपलब्ध मनुष्यशक्तीचा विचार करता त्याला मर्यादा आहेत. वेगाने बदलत चाललेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आपल्या मुलामुलींसाठी हे कार्यक्रम तातडीने गावोगावी सुरू व्हावेत असे अनेक पालकांना वाटते. काहींची वेळ देण्याचीही तयारी आहे. पण कार्यक्रम काय करावेत, कसे करावेत याबाबत स्पष्टता, आत्मविश्वास, कौशल्य नसल्याने प्रत्यक्ष उपक्रमांना प्रारंभ होऊ शकत नाही. ही अडचण लक्षात घेऊन **विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंसेवी वृत्तीने ज्ञान प्रबोधिनीचे विविध कार्यक्रम आपापल्या गावी सुरू करू इच्छिणाऱ्या युवक-युवती-पालक-शिक्षक यांच्यासाठी हे 'संयोजक प्रशिक्षण शिबिर' आयोजित केले आहे.**

**शिबिराचा कालावधी :** २८ एप्रिल ते १ मे १९९६.

**शिबिरस्थान :** ज्ञान प्रबोधिनी, पुणे **शिबिर शुल्क :** रु. १००/-

शिबिर निवासी असून निवास-भोजनाचा खर्च शिबिर शुल्कातून केला जाईल. प्रवेश संख्या मर्यादित असल्याने लवकरात लवकर स्थानिक कार्यालयात नावनोंदणी करावी.

**वरील सर्व शिबिरांची तपशीलवार माहिती स्थानिक व मुख्य कार्यालयांमध्ये मिळू शकेल.**



**'गिर्यारोहणगाथा' रु. ४०/- (गिर्यारोहणासंदर्भात माहिती देणारे पुस्तक) - छात्र प्रबोधन प्रकाशन.**

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध मार्गदर्शन व अभ्यास कौशल्ये प्रशिक्षण शिबिर

**१० वीत जाणाऱ्या मुलामुलींसाठी ६ दिवसांचे शिबिर**

**कालावधी :** १८ मे ते २४ मे १९९६ **शिबिरस्थान :** ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

**शुल्क :** रु. ३००/- (यामध्ये सुमारे १७५ रुपयांचे साहित्य, पुस्तके, टिपणे इ. दिले जाते.) रोज ५ तास राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सराव असेल. ३ तास अभ्यास कौशल्यांचे प्रशिक्षण व सराव असेल. २ तास अन्य कार्यक्रम असतील. शिबिर निवासी नसेल. तथापि ज्यांची निवासाची सोय अन्यत्र होऊ शकणार नाही अशांची सोय ज्ञान प्रबोधिनीत होऊ शकेल. त्यांनी भोजनाचा खर्च रु. २००/- स्वतंत्रपणे भरावा.

## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

**निगडी** : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. % ८४३८०

**सोलापूर** : ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर % २५७८२

**सातारा** : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ सातारा. % ५०५०४

**सांगली** : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली.

**कोल्हापूर** : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर % २१५३४

**नाशिक** : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रोड, नाशिक. % ५७४८३०

**ठाणे** : डॉ. अजित दातार, बी-२० अहिल्या सोसा., घंटाळी रोड, ठाणे (प.) % ५४२१०८७

**डोंबिवली** : सौ. ज्योती औटी, ३-श्री बिल्डिंग, टिळकनगर हायस्कूल जवळ, डोंबिवली (पूर्व) % ४७४१३९

**पनवेल** : सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी. एल.-६-१३-६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, नवीन पनवेल.

**रत्नागिरी** : कु. नीता अ. श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. % २२४८७

**धुळे** : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे.

**चाळीसगाव** : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक, गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव.

**परभणी** : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी.

**लातूर** : डॉ. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. % ४३६१४

**औरंगाबाद** : १) कर्नल पी. एन. मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७, सेक्टर नं. 'C' N-1 भक्तीनगर, गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद. % ४८२६२६

२) सौ. स्वाती शरद पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद ३.

**बेळगाव :** अमित कुलकर्णी, ३७५ नेहरू रस्ता, टिळकवाडी, सोमवार पेठ, बेळगाव.

या कार्यालयामध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधन द्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

**या व्यतिरिक्त मुंबई, अहमदनगर, जालना, जळगाव, रायगड, सिंधुदुर्ग, बीड, उस्मानाबाद या ठिकाणी छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये सुरू करावयाची आहेत. इच्छुकांनी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून सौर फाल्गुन १ शके १९१७ , २० फेब्रुवारी १९९६
या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस येथे छापून ज्ञान प्रबोधिनी पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.



**हस्ताक्षर सुधारण्यासाठी वापरा 'असे घटते सुंदर अक्षर' - छात्र प्रबोधन प्रकाशन**

।। सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमत्त्व येथे ।।

**छात्र प्रबोधन .... निव्वळ मासिक नव्हे ! .... कृतिशील उपक्रमांचा स्रोत !**

# ५ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्रात १८ ठिकाणी शिबिरे !

## व्यक्तिमत्त्व विकास शिबिर

**खेळ, व्यायाम**
- देशी विदेशी खेळ
- नावीन्यपूर्ण बरची नृत्य
- योगासने

**विज्ञान प्रयोग**
- शास्त्रीय उपकरणे करणे
- प्रयोग, प्रकल्प करणे
- शोध तपासून पाहणे

**हस्तकौशल्ये, छंद वर्ग**
- बांधणी, रांगोळी
- कागदी फुले, भेटवस्तू
- नाट्य, वक्तृत्व, स्फूर्तीगीते

**विविध स्पर्धा**
- गंमत जत्रा
- बुद्धिबळ, सामान्यज्ञान
- क्रीडा स्पर्धा

**सहल-भेटी-मुलाखती**
- देशी विदेशी खेळ
- नावीन्यपूर्ण बरची नृत्य
- योगासने

**कथाकथने-चर्चा**
- प्रेरक, मनोरंजक कथा
- सद्य घडामोडींवर चर्चा
- व्यक्तिमत्त्व विकसन व्याख्याने

## मुलांसाठी शिबिरे

**कालावधी :** २३ ते २९ एप्रिल ९६
**ठिकाणे :** परभणी, रत्नागिरी
**कालावधी :** १ ते ७ जून ९६
**ठिकाणे :** सांगली, सातारा, कोल्हापूर, धुळे, नाशिक, ठाणे, लातूर, औरंगाबाद

## मुलींसाठी शिबिरे

**कालावधी :** १ मे ते ७ मे ९६
**ठिकाणे :** सांगली, सातारा, कोल्हापूर धुळे, नाशिक, ठाणे, लातूर, पुणे

शिबिराचे शुल्क : रु. ५०/- (सभासदांसाठी रु. ४०/-)

शिबिरस्थान, नावनोंदणी व अन्य तपशिलांसाठी छात्र प्रबोधनच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधा.

शिबिराचे शुल्क भरून लवकरात लवकर आपले नाव निश्चित करा.
आपल्या मित्रमैत्रिणींनाही शिबिरात सामील करून घ्या !
व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या शिबिरांमध्ये सहभागी व्हा !

नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे, १० वी मार्गदर्शन शिबिर व संयोजक प्रशिक्षण शिबिर (पालक-शिक्षकांसाठी) या शिबिरांची माहिती आतील पानावर दिली आहे.

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW / 349, तिकिटाशिवाय पाठविण्याच्या परवाना क्र. १२८

# आम्ही उसळत्या लाटा

आम्ही उसळत्या लाटा चैतन्य सागरीच्या ॥ध्रु.॥

आम्ही उत्कंठ भूमिच्या अंकुरल्या आकांक्षा
आम्ही पोलादी पंखांनी झेपावतो दशदिशा
आणि अमृतकलश अर्पितो पदी आईच्या ॥१॥

आहे ज्वालांशी फुलांशी प्रखर कोमल नाते
आहे तेजस्वी संयत आमुच्या खड्गाचे पाते
दिसो दुरित कोठेही कोसळू मस्तकी त्याच्या ॥२॥

आम्ही प्रसन्न पुष्पांच्या उमलत्या पाकळ्या
आम्ही आदित्य तेजाच्या धाकुल्या किरणकळ्या
देवभूमिच्या पूजेत उजळू ज्योती प्राणांच्या ॥३॥

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ ४४८६११
**कार्यालयाची वेळ :** स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत :** रुपये ६०
**वार्षिक वर्गणी :** रुपये ७५
**प्रकाशन दिनांक :** राष्ट्रीय सौर १ फाल्गुन, शके १९१७
२० फेब्रुवारी, १९९६